सायंदैनिक
# प्राजक्त
संस्थापक व आद्य संपादक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी



श्रीपरशुराम



श्रीकोळेश्वर



श्रीयोगेश्वरी

भावे मित्र मंडळाचे द्वै मासिक

# ‘भावे-प्रयोग’

भावे मित्र मंडळ
एक परिवार

भावे मित्र मंडळाचे द्वैमासिक सप्टेंबर, २०२२

# ‘चाफा’ बोलेना...

© डॉ. सरिता विनय भावे, मुंबई.
छायाचित्रे – डॉ.सरिता आणि डॉ.विनय भावे, मुंबई.

‘चाफा बोलेना, चाफा चालेना, चाफा खंत करी, काही केल्या फुलेना...’या कवितेच्या (कवी बी – नारायण मुरलीधर गुप्ते) आधाराने आपल्या भावविश्वात प्रवेश करणारा चाफा अजूनही तिथेच ठाण मांडून बसला आहे! माझ्यासारख्या पामरांना जरा तरी ही कविता समजावी म्हणून शालेय पाठ्यपुस्तक मंडळाने कवितेखाली दिलेल्या टीपेत चाफ्याला ‘रुसलेल्या प्रियकराचे’ प्रतीक मानले होते. हा अर्थ समजायला सोपा असला तरी जरा खोल गेल्यावर कवितेचा गर्भितार्थ आध्यात्मिक असून जिवाशिवाचे मिलन, परमेश्वराशी एकरूप झाल्यावरच आत्मारूपी ‘चाफा फुली, आला फुलून...’ घडते, हे लक्षात येते. ‘रुसलेली काव्यप्रतिभा’ असेही याबद्दलचे विवेचन वाचनात आले होते. ते काहीही असेल, या कवितेमुळे कवी बीं नंतरच्या बहुतांश कवींनी चाफ्यावर कविता करताना त्याला ‘अबोल’ ठरवले आहे! कवयित्री पद्मा गोळे यांच्या ‘चाफाच्या झाडा...’ कवितेतही... ‘कुठे नाही बोलायचं, मनातच ठेवायचं...’ या ओळींमुळेही हाच भाव अधोरेखित होतो असे वाटते. स्वत: अबोल राहून इतरांना एवढे बोलते करणारा, व्यक्त व्हायला भाग पाडणारा हा चाफा ‘एकमेवाद्वितीय’च आहे!



जगभरात चाफा ‘शोभेचा वृक्ष’ म्हणून नावाजला जातो. परसदार, कार्यालयीन बागा, सार्वजनिक उद्याने इथे तो हमखास उपस्थित असतो. देवालये, लग्नसमारंभ, अंत्यविधी सगळीकडे तो हजेरी लावतो. त्याच्या संस्कृत भाषेतील ‘चंपक’ नावावरून चंपा, चंपक (हिंदी, मराठी, उर्दू, बंगाली), साचो चंपो (गुजराती), संपिगे (कानडी), चंबुगम (तामिळ) अशी नावे त्याला मिळाली आहेत. सतेज गौरवर्णासाठी चाफ्याच्या फुलाची उपमा आणि विशेषत: तरतरीत नाकांसाठी चंपाकली, चाफेकळी आपल्याकडील साहित्यात सुप्रसिद्धच आहेत! अशा या रंगा-गंधाने ओतप्रोत भरलेल्या चाफ्याच्या फुलाचे महाराष्ट्रात विविध प्रकार आढळतात -

**१) सोनचाफा -** नुसते ‘चाफा’ म्हटले की महाराष्ट्रात त्याचा खरा अर्थ ‘सोनचाफा’ असाच असतो! वैयक्तिकरित्या सांगायचे तर या फुलाने मला जाणीव करून दिली की, मराठी नुसतेच चांगले बोलता/लिहिता/वाचता आले म्हणजे तुम्ही खऱ्या अर्थाने ‘मराठी’ झालात, असा होत नाही! ‘मऱ्हाटी’ पणाचे एक ‘व्यवच्छेदक लक्षण’ म्हणजे ‘सोनचाफा’ तुम्हाला माहीत असणे व तो अतिशय आवडणे नितांत गरजेचे असते! मला वर्षानुवर्षे याचे झाड तर दूरच, फुलही माहीत नव्हते. नंतर याच्याशी ओळख होऊन भेटीगाठी होत राहिल्या तरी याच्या सुगंधाने नेहमीच डोकेदुखी होत असल्याने इतर झाडा/फुलांसारखी मी फारशी याच्या गळ्यात पडत नाही! पण एखाद्या ‘रईस’ आसामीचे सरकारी दरबारी ‘वजन’ असावे, तसे या ‘गर्भश्रीमंत’ सोनचाफ्याचे भारतीय/मराठी जनमानसात, साहित्यात इतके ‘वजन’ आहे की अभ्यासासाठी म्हणून का होईना, माझ्या सारख्यांनाही दखल घ्यायला तो भागच पाडतो!

‘गीर्वाण’ भाषेत ‘सुवर्णचंपक’ या सुरेख नावाबरोबरच सोनचाफा कुसुमाधिप, वनदीप, दीपपुष्प, पीतपुष्प, हेमपुष्प, सुकुमार, गन्धमोदन, अतिगन्धक इत्यादि अतिसुंदर नावांनी नावाजला जातो. वनस्पतीशास्त्रात तो *Magnolia champaca* या नावाने ओळखला जातो. यावरून ‘चाफा’ म्हणजे ‘चंपक’ आणि खरा ‘चंपक’ म्हणजे ‘सुवर्णचंपक’च असे मानाचे स्थान आणि मान्यता सोनचाफ्याला जागतिक स्तरावरही प्राप्त झाली आहे हे लक्षात येते.

सोनचाफ्याचे झाड सुबक असून भेगाळलेले खोड उंचसर वाढते. टोकाला छत्रीसारखा पर्णसंभार असतो. पाने लांबट, टोकेरी, दंतुर असून खालच्या बाजूला लवदार असतात. फुलांत पांढरा, पिवळा, गर्द नारिंगी रंग आढळतात. बाजारात सोनचाफा म्हणून विकायला आणलेली फुले नसून कळ्या असतात. कारण कळी उमलायला लागली की याच्या पाकळ्या, पाकळ्यांसारखीच दिसणारी निदलपुंजाची दले सुध्दा गळायला लागतात (लेखातील छायाचित्रात दर्शवल्याप्रमाणे उमललेल्या फुलांत पाकळ्या आणि दले दिसत आहेत). मादक घमघमाट आणि सुकल्यानंतरही दरवळत राहणारा सुवास या फुलाची वैशिष्ट्ये आहेत. याच्यापासून तयार केलेल्या तेला/अत्तराला भरपूर मागणी असून ती बरीच महागडी असतात. काचेच्या सुशोभित बाटल्यांमध्ये पाण्यात या फुलांना ठेवून त्यांचा ताजेपणा दीर्घकाळ टिकवतात. सोनचाफ्याची फळे द्राक्षासारखी घडात येतात. दिसायला मात्र ती लिचीच्या फळांसारखी खवलेदार असतात. झाडाची साल ज्वरप्रतिबंधक, मूत्रजनक, स्वेदजनक, वातहर, श्लेष्महर, आमनाशक असते.

अभिजात संस्कृत साहित्यात गर्भवती स्त्रीप्रमाणेच वृक्षांनाही ‘दोहद’ म्हणजे ‘डोहाळे’ लागतात आणि ते पुरवले गेल्यानंतरच त्यांना फुले येतात असा सुंदर कविसंकेत आहे. या विशिष्ट ‘दोहद’ वृक्षांमध्ये, सोनचाफा ‘सुंदर स्त्रियांच्या प्रसन्न स्मिताने फुलतो’ असे मानले गेले आहे. प्राचीन साहित्यात

(पान क्र. ३ वर)

# संपादकीय

Unsung Heros **गाऊ त्यांना आरती! या लेखमालिकेतून भावे कुलात आपल्या कार्यकर्तृत्वाने विविध क्षेत्रात ज्यांनी आपला ठसा उमटवला अशा व्यक्तींची माहिती देण्याच्या या उपक्रमाला वाचकांची पसंती असल्याचे त्यांच्या प्रतिक्रियांमुळे/येणाऱ्या फोनमुळे लक्षात येते आहे. अनेक अलौकिक, दुर्मिळ गुणवत्ता असलेल्या भावे कुलातील व्यक्ती केवळ प्रसिद्धीचे कोंदण न लाभल्यामुळे विस्मृतीत गेल्या. प्रत्येक भावे घराण्यात अशा व्यक्ती विस्मृत झालेल्या आहेत. अशा व्यक्तिमत्त्वांचा परिचय करून देणे हे या सदराचे महत्त्व आहे. तेव्हा पुनश्च एकदा विनंती की कुलवृत्तांतात आपल्या घराण्यातील अशा व्यक्तींचा नुसता नामोल्लेख किंवा साधा परिचय असेल अशांनी त्यांची माहिती आम्हास पाठवावी, माहेरवाशीणींनीही आपले वडील किंवा पूर्वजांबद्दल माहिती द्यावी, म्हणजे ती पुढील अंकांमधून प्रकाशित करता येईल.**

**'उद्योजक म्हणून घडताना' या भावे कुलातील निरनिराळ्या उद्योजकांच्या प्रवासाच्या माहितीच्या सदरालाही असाच प्रतिसाद मिळत आहे. भाव्यांमधील व्यावसायिकांनी आपण व्यवसाय का करू लागलो, त्या मागची प्रेरणा कोणाची, व्यवसाय करताना अडचणी काय आल्या असे अनुभव कथनाची ही लेखमाला आहे. आपल्याच उद्योगाची माहिती कशाला द्यायची, किंवा कशी द्यायची असा विचार न करता अशी माहिती जरूर लिहून पाठवावी. आपले व्यावसायिक अनुभव मराठी, इंग्रजी, हिंदी या कोणत्याही भाषेतून साधारण १००० ते १२०० शब्दांत लिहून** bhave1956@gmail.com **या मेलवर पाठवावेत. व्यवसायात नव्याने येणाऱ्या भावी पिढीसाठी हे अनुभव निश्चित मार्गदर्शक ठरतील.**

**अनेकांना लिखाणाची सवय नसते अशांनी ऑडियो रेकॉर्डिंग करून ते पाठवल्यास त्यावरूनही लेख तयार करून घेता येईल.**

**'भावे-प्रयोग'या प्राजक्ततर्फे प्रकाशित होणाऱ्या अंकात आपला सहभाग लिखाणाच्या रूपाने हवा आहे. आपल्यात सिद्धहस्त लेखक आणि कवी आहेत, त्यांचेही साहित्य प्रकाशित करायची संधी मिळावी असे आवाहन याद्वारे मी करीत आहे. अनेकांना मी भेटत असतो, त्यावेळी त्यांना तुम्ही तुमच्या पद्धतीने लिहून द्या, त्यावर संपादकीय संस्कार करून, लिखाण व्यवस्थित करून घेईन असे मी सांगत असतो. त्यामुळे आपल्याला सुचलेल्या विषयावरील लिखाण जरूर पाठवावे, ही विनंती.**

**अभय शंकर भावे**

९४२२३०६०३३ ✆ Whats App / ७०२०६४५८९२

पोस्टाने अंक न मिळण्याचे प्रमाण भरपूर आहे. अंक ई मेलने पाठविण्याचा प्रयोग चांगलाच यशस्वी ठरतो आहे. असाही एक सूर ऐकू आला की व्हॉट्स् अपवर अंक पाठवा, पण ते शक्य नाहीये हे लक्षात घेऊनच ई-मेलचा मार्ग निवडला आहे. कुटुंबातील सर्वांचे मेल अ‍ॅड्रेस पाठवावेत. अजूनही अनेकांचे मेल अ‍ॅड्रेस उपलब्ध झालेले नाहीत, तरी आपले मेल अ‍ॅड्रेस bhave1956@gmail.com या मेलवर कळवावेत म्हणजे पुढील अंक मेलनेही पाठवता येतील. मेल करताना आपल्या संपूर्ण नावासह पूर्ण पत्ता व फोन नंबरही कळवावा.

## अंकाबद्दल प्रतिक्रिया

सस्नेह नमस्कार,
अंक मिळाला. आपले अभिनंदन. अंकाची रचना आणि लेखांचा दर्जा उत्तम आहे. आपल्याकडे एकापेक्षा एक नाणावलेली मंडळी आहेत, उदाहरणार्थ डॉ. भूषण विठ्ठल भावे; डॉ. कु. ऐश्वर्या चिंतामणी भावे. अशांचा परिचय करून दिला तर १०/५ अंक भरतील. **ॲड. दिनकर परशराम भावे, मुंबई.**

सगळंच वाचनीय आहे ! **सौ. चित्रा किरण भावे, पुणे.**

नमस्कार,
प्राजक्तचा अंक मिळाला. अंक नेहेमीप्रमाणे वाचनीय आहे. बाकी सर्व क्षेम. सर्वांना नमस्कार. **सदानंद रामचंद्र भावे, पुणे.**

नमस्कार,
कदंब झाडाची माहिती खूप छान आहे. आमच्या घराजवळ हा वृक्ष आहे. ह्या लेखामुळे त्याचे नाव समजले. चित्रा भावे यांचा लेख उद्बोधक आहे. उर्वरित सर्व लेख सुंदर आहेत. धन्यवाद. **अंजली गोविंद भावे, कल्याण.**



**कु. देवश्री संजय भावे, गुहागर** हिने मराठवाडा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पुणे येथून आर्किटेक्चरच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेत ८३% गुण मिळवून ती आर्किटेक्ट झाली. देवश्रीने आर्किटेक्चरचे शिक्षण घेताना गुणांचे सातत्य कायम राखले आहे. प्रत्येक वर्षी तिने असेच मार्कस् मिळवले आहेत. देवश्रीचे वडील हयात नसताना तिने हे यश मिळवले आहे हे कौतुकास्पद असेच आहे. कु. देवश्री संजय भावेला ती शाळेत असल्यापासून भावे शिक्षण निधीतून मदत दिली जात होती.

**भावे मित्र मंडळातर्फे तिचे हार्दिक अभिनंदन!!!**

## साभार कृतज्ञता

**१) रजनी श्रीरंग भावे, पुणे यांनी कै.श्रीरंग नारायण भावे यांचे स्मरणार्थ दोन हजार पाचशे रुपयांची २) अमृत नंदकुमार भावे, ठाणे यांनी एक हजार रुपयांची ३) राजेश कृष्ण भावे, मुंबई यांनी त्यांचे वडील कै.कृष्ण हरी भावे यांचे स्मरणार्थ पाच हजार एकशे एक रुपयांची ४) नितीन रामचंद्र भावे, खोपोली यांनी त्यांचे वडील कै.रामचंद्र गोविंद भावे यांचे स्मरणार्थ पाच हजार एक रुपयांची देणगी भावे मित्र मंडळाच्या भावे शिक्षण निधीस दिली आहे.**

**राजेश कृष्ण भावे, मुंबई यांनी पाच हजार एक रुपयांची व विवेक नारायण भावे, कोटा(राजस्थान) यांनी पाच हजार रुपयांची व नागपूरच्या भावे मित्र मंडळाच्या शाखेने आठ हजार रुपये स्वनिधीस देणगी दिली आहे.**

**विवेक नारायण भावे, प्राजक्ता विवेक भावे, सुश्रुत विवेक भावे, सुकीर्ती विवेक भावे, कोटा(राजस्थान) यांनी प्रत्येकी एक हजार रुपये भरून ते भावे मित्र मंडळाचे सदस्य झाले आहेत.**

**भावे मित्र मंडळ त्यांचे अतिशय आभारी आहे.**

(पान १ वरून)

अनेक ‘दृष्टांत, ‘न्याय’, ‘अन्योक्ति’ मध्ये सोनचाफा आवर्जून येतो. सोनचाफ्याने आपल्या रूपा/गंधाने ज्ञानेश्वर माऊलींपासून, बालकवी ते आरती प्रभूंपर्यंत सगळ्यांना मोहित केले आहे. माऊलींनी तर अनेकदा चाफ्याचा दृष्टांत वापरला आहे. ‘घनु वाजे घुणघुणा...’ या विराणीत त्यांनी ‘चांदु वो चांदणे! चांपे वो चंदने! देवकीनंदनेविण नावडे वो!!’ (श्रीकृष्णाच्या अनुपस्थितीत चंद्र, चांदण्या, चाफा, चंदन काहीही मनास भावत नाही असे राधा/गोपी यांना वाटते) असे ईश्वराबद्दलचे प्रेम विशद करताना सौंदर्याचे प्रतीक म्हणून चाफा (आणि गंधासाठी चंदन) निवडला आहे. ‘श्रावणमासी’ कवितेत बालकवींनी ‘सुवर्णचंपक फुलला, विपिनी रम्य केवडा दरवळला...’ अशी पंक्ति लिहिली आहे. ‘मी डोलकर डोलकर...’ या लोकप्रिय कोळी गीतात, शांताबाई शेळके यांनी (संगीत - पं. हृदयनाथ मंगेशकर, स्वर - हेमंतकुमार, लता मंगेशकर) ‘माज्या केसान् गो मालीला फुलैला चाफा, वास परमालता वाऱ्यानं घेतंय झेपा...’ असे चाफ्याची फुले केसांत माळण्याच्या स्त्रियांच्या हौसेचे आणि वायु लहरींबरोबर प्रवास करणाऱ्या त्याच्या परिमळाचे चपखल वर्णन केले आहे. ‘चाफेकळी’ म्हणजे अर्धस्फुट, अर्धोन्मिलित, निरागस, नवयौवना! ‘निवडुंग’ चित्रपटातील (१९८९) ‘तू तेव्हा तशी...’(कवी - आरती प्रभू, संगीत/गायन - पं. हृदयनाथ मंगेशकर) या मंत्रमुग्ध करणाऱ्या गीतात म्हणून प्रेयसीलाच ‘चाफेकळी प्रेमाची’ अशी गोड उपमा दिली आहे. वसंत कानेटकर यांनी लिहिलेले ‘मत्स्यगंधा’ नाटकातील बालकवी यांनी रचलेले ‘गर्द सभोती रान साजणी तू तर चाफेकळी...’ हे नाट्यगीत (संगीत - पं. जितेंद्र अभिषेकी, स्वर - आशालता वाबगावकर) अजुनही नाट्यरसिकांच्या स्मरणात आहे.

**२) कवठी चाफा -** याचे वनस्पतीशास्त्रातील नाव *Magnolia grandiflora.* हा सोनचाफ्याच्या जातकुळीतला. भारताच्या उत्तरपूर्व राज्यांत प्रकर्षाने आढळतो. मध्यम उंचीच्या झाडाला भलीमोठी, अतिसुगंधी फुले येतात. पिकलेल्या कवठासारखा गोड वास असल्याने याला ‘कवठी चाफा’ म्हणतात.




**३) देवचाफा/खैरचाफा -** हा नेहमीचा, सर्वत्र आढळणारा, माझ्यासाठीचा ‘खरा’ आणि ‘प्रिय’ चाफा! वनस्पतीशास्त्रातील *Plumeria* या चाफ्याच्या प्रजातीत रात्री उमलणाऱ्या पांढऱ्या, पिवळ्या, लाल चाफ्याचा सामावेश होतो. जगभरात हा ‘फ्रांजीपानी/टेम्पल ट्री/पॅगोडा ट्री/ग्रेव्हयार्ड ट्री’ या नावांनी प्रसिद्ध असून हिंदी भाषेत ‘गुल-ए-चिन’ असे मधुर नाव त्याला मिळाले आहे. आशिया खंडात हा देव, देवालये, पिशाच्च, स्मशानभूमीशी निगडीत आहे. प. बंगालमध्ये पांढरा चाफा मर्तिकाशी तर प. कर्नाटकात पिवळा चाफा लग्नकार्याशी संबंधित आहे. ‘माझ्या गोव्याच्या भूमीत, चाफा पानाविण फुले; भोळा भाबडा शालिन, भाव शब्दाविण बोले!!’ अशा लडिवाळ शब्दांत गोवा आणि चाफाप्रेम व्यक्त करणाऱ्या कविवर्य बा.भ. बोरकरांच्या लाडक्या गोवा राज्याचे चाफा हे ‘राज्यफुल’ आहे. सांगाड्यासारखे दिसणारे चाफ्याचे हे झाड मध्यम उंचीपर्यंत वाढते. खोड गाठीदार असून चीकयुक्त असते. फांद्यांच्या टोकाला गुच्छाने येणारी पाने चकचकीत, गर्द हिरवी, लांबसर, टोकाला वाटोळी असतात. लांब देठांची सुगंधी फुलेही फांद्यांच्या टोकाला गुच्छानेच येतात.

**४) हिरवा चाफा -** इतर भारतीय भाषांत हरी चंपा, मदनमस्त, मनोरंगिनी अशी बहारदार नावे असलेल्या हिरव्या चाफ्याला वनस्पतीशास्त्रात *Artabotrys odoratissimus* असे म्हणतात. याची वेल असते. आधार मिळाला नाही तर ती स्वत:लाच स्वत:भोवती गुरफटून घेते. पाने, फुले, फळे सगळीच हिरवी असतात. ज्या दिवशी फूल तयार होते त्यादिवशी याचा धुंद करणारा सुगंध परिसरात दरवळायला लागतो, तेव्हा त्याच्या अस्तित्त्वाची जाणीव होते. फूल पिवळे झाल्यावर सुवास जास्त तीव्र होतो. तशा दुर्मिळ (सहज न आढळणाऱ्या) असणाऱ्या हिरव्या चाफ्याला मराठी जनमानसात वेगळेच स्थान आहे. ज्ञानपीठ विजेते लेखक वि. स. खांडेकर यांनी ‘हिरवा चाफा’ नावाची कादंबरी लिहिली होती. कविवर्य ग. दि. माडगूळकर यांनी रचलेले ‘लपविलास तू हिरवा चाफा, सुगंध त्याचा छपेल का? प्रीत लपवुनी लपेल का?’ हे भावगीत {संगीत - प्रभाकर जोग, स्वर - मालती पांडे (बर्वे)} हिरव्या पानांत लपलेल्या हिरव्या चाफ्याचा न लपणारा गहिरा सुगंध आणि नव्हाळीतले प्रेम यातील साम्य रसिकतेने व्यक्त करते.

नागचाफा, भुईचाफा असेही चाफ्याचे प्रकार महाराष्ट्रात आढळतात. फुलांचा वेणी, गजरा, माळा यांत तर चाफ्यांच्या अर्काचा सुगंधी तेले, अत्तरे, उदबत्ती यामध्ये उपयोग केला जातो. ‘चंपाकळी’ नावाची मैद्यापासून तयार केलेली मिठाई गौरींच्या नैवेद्यात बनवली जाते. ‘चंपाकली’ नावाचा गळ्यात घालायचा अलंकारही असतो. ‘चंपाकली’ नावाचा एक हिंदी सिनेमाही (१९५७) प्रदर्शित झाला होता. ‘सुन चंपा, सुन तारा...’, ‘बेला, गुलाब, जूही, चंपा, चमेली...’ या गीतांमध्येही तो आवर्जून येतो. ‘चंपक’ नावाचे लहान मुलांचे मासिकही गाजले होते. चंपानगर (महाभारतातील कर्णाच्या अंगदेशची राजधानी), चंपानेर, चंपारण, चाफळ या गावांच्या नावांत आणि चाफेकर, चाफळकर आडनावात तो येतो. महाराष्ट्रातील अलिबागच्या जवळ असलेल्या सातवाहन कालातील ‘चौल’ या बंदराचे पौराणिक नाव ‘चंपावती’ होते (आणि रेवदंड्याचे रेवती!). त्या परिसरात असलेल्या चाफ्याच्या भरपूर झाडांमुळे आणि ‘चंपावती’ देवीच्या मंदिरामुळे हे नाव त्या बंदराला मिळाले असेल. चाफ्याला धार्मिक अधिष्ठानही भरपूर लाभले आहे. चंपाषष्ठीला (मार्गशीर्ष शुक्ल षष्ठी) देवांच्या सैन्याचे सेनापतीत्त्व स्वीकारून ज्येष्ठ शिवपुत्र कार्तिकेयाने तारकासुराचा वध केला होता. कर्नाटकात या तिथीला चाफ्याची फुले प्रिय असणाऱ्या कार्तिकेयाचे भक्तिभावाने पूजन केले जाते. चंपाषष्ठीला महाराष्ट्रात जेजुरीगडाच्या खंडेरायाला सहा दिवस भंडारा, रोडगा, वांग्याच्या भाजीचा नैवेद्य दाखवून चाफ्याची फुले उधळतात. या बाबत अशी दंतकथा आहे की मल्ल आणि मणी या दानवांपासून सामान्य जनता, साधुसंतांचे संरक्षण करण्यासाठी महादेवाने खंडोबाचे (मल्ल + अरि = मल्हारी) उग्र रूप धारण करून त्यांचा नायनाट केला होता, याबद्दल कृतज्ञता म्हणून भाविक हे व्रत करतात.

भुंगा कधीच चाफ्याला स्पर्श करत नाही असे म्हणतात (जी. ए. कुलकर्णी यांच्या ‘विदूषक’ कथेतही याचा उल्लेख येतो). या नैसर्गिक सत्याचा अतिशय उत्कृष्ट उपयोग ‘कवी भूषण’ यांनी छत्रपती शिवाजीमहाराज यांचे गुणगान गाताना केला आहे. औरंगजेबाचे मांडलिक असणाऱ्या इतर सर्व सरदारांना विविध फुलांची उपमा देऊन ते म्हणतात, ‘लेइ रस एतेन को बैठिन सकत अहै, अलि नवरंगजेब चंपा सिवराज है’. अर्थात, अलि म्हणजे भुंगा जसा फुलाफुलातून मध गोळा करतो तसा हा भुंगारूपी औरंगजेब सगळ्या राजांकडून कर गोळा करतो, पण चंपकपुष्पाप्रमाणे असणाऱ्या शिवरायांच्या वाटेला मात्र हा भुंगा कधीही जात नाही! खरेच, या कर्तव्यदक्ष राजाशी तुलना झाल्याने चाफ्यालाच आपले आयुष्य धन्य झाले आहे असे वाटले असेल!

संदर्भ -

१) अचूकतेसाठी तांत्रिक माहिती आंतरजालावरून घेतली आहे.

२) वृक्ष - अनुबंध - प्रा. नीला कोर्डे (२०१८, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, गिरगाव, मुंबई - ४००००४)

३) आभार - डॉ. वामन गणेश देसाई लिखित ‘औषधी संग्रह’ या पुस्तकातील (श्रीगजानन बुक डेपो प्रकाशन, दादर, मुंबई -२८, प्रकाशन १९७५) ‘सोनचाफा’ विषयक मजकूर उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. श्रीकांत गोडबाले, मुंबई यांचे मन:पूर्वक आभार!

**संपर्क :** ३०६, डॅफोडिल, नीलकंठ गार्डन, गोवंडी(पूर्व) मुंबई ४०००८८ **भ्रमणध्वनी :** ९८६९०५१८१९


⌘⌘⌘

## Unsung Heros
## गाऊ त्यांना आरती!

**© शशिकिशोर दत्तात्रय भावे, पुणे.**

**१) अडोम घराण्याच्या नागपूर शाखेतील, राष्ट्रपती पोलीस पदक विजेते, पोलीस आयुक्त सुधाकर विनायक भावे.**

नागपूरच्या एका भावे कुटुंबात अनेक कर्तबगार अधिकारी होऊन गेले आहेत. अडोम घराण्यातील सुधाकर विनायक भावे हे या पैकी एक होत. १२ मार्च १९३३ मध्ये नागपूर येथे जन्मलेल्या सुधाकर भावे यांनी शालेय व महाविद्यालयीन जीवनात उत्तम यश संपादन केलेले होते. गणित विषयात ते द्वि पदवीधारक असून व्यवस्थापन क्षेत्रातही त्यांनी पदविका प्राप्त केली होती. प्रारंभी काही वर्षे त्यांनी गणिताचे प्राध्यापक म्हणूनही काम पाहिले. महाविद्यालयीन शिक्षण पुरे होण्याआधीच त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्पर्धा परीक्षा दिली होती. त्या परीक्षेत त्यांची निवड भारतीय पोलीस सेवेत झाली. त्यामुळे प्राध्यापकीय नोकरी सोडून ते पोलीस सेवेत दाखल झाले. माऊंट अबू येथील केंद्रातील पोलीस प्रशिक्षण पुरे केल्यानंतर त्यांची महाराष्ट्र राज्यात नेमणूक झाली. पोलीस दलातील नोकरी ही जनसेवेची एक अपूर्व संधी आहे या भावनेतून त्यांनी पोलीस खात्यातील अनेक महत्त्वाची पदे सांभाळली. पोलीस खात्यातील नोकरीत अनेक प्रलोभने असतात. परंतु स्वत:च्या मुल्यांशी प्रामाणिक राहून त्यांनी कसलीही तडजोड न करता निष्ठापूर्वक सेवा केली. प्रामाणिकपणा व कार्यनिष्ठा यांच्या गुणांचे त्यांनी अंगिकारलेले महत्त्व ओळखून शासनाने त्यांना अनेक जबाबदारीच्या कामांचे धुरीणत्त्व दिले. त्यांची नेमणूक गुप्तचर विभागात झाली. अनेक महत्त्वाची जटिल व गुंतागुंतीची प्रकरणे त्यांनी अतिशय हुषारीने व दक्षतेने सोडविली. रेल्वे मार्गावरील प्रमुख या नात्याने त्यांनी मालाचे अपहरण, रेल्वे मार्गावरील चोऱ्या यामध्ये अविश्रांत लक्ष घालून ५ वर्षांत रेल्वेची नुकसानी पुर्वीपेक्षा निम्म्यावर आणली. त्यांनी सांभाळलेल्या अन्य कामात पोलीस अधिक्षक अहमदनगर व ठाणे ही ठिकाणे आहेत. त्यांची अँटीकरप्शन विभागातील सेवाही उल्लेखनीय ठरली. त्यांच्या कर्तबगारीची दखल घेऊन सरकारने त्यांना पोलीस आयुक्त पुणे व पोलीस आयुक्त बृहन्मुंबई ही पदे बहाल करून त्यांची वाखाणणी केली. टाडाचा कुशलतेने वापर करून त्यांनी मुंबईतील टोळी युध्दाला आळा बसविला. केंद्र सरकारने त्यांना दीर्घ व प्रशासनीय सेवेसाठी पोलीस पदक व नंतर लक्षणीय सेवेसाठी दिले जाणारे राष्ट्रपतींचे पोलीस पदक देऊन त्यांचा गौरव केला. शेवटी ते महासंचालक अँटी करप्शन ब्यूरो या पदावरून निवृत्त झाले. लहानवयापासून त्यांना संगीत व गणित या विषयात रस होता. त्यांच्या पोलीसखात्यातील जोखमीच्या व धकाधकीच्या



काळात त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. शारदा भावे यांनी उत्तम प्रकारे सहयोग दिला. सध्या त्यांचे वास्तव्य ठाण्याला आहे. त्यांच्या मुलाने व मुलीने वैद्यकीय क्षेत्र निवडले आहे. **अशा विद्वान आणि कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्यांचा जीवनपट भावे मंडळींना अभिमानास्पद वाटावा असाच आहे.**

**२) कळंबुशी घराण्यातील, युनायटेड इंग्लिश स्कूल, चिपळूणचे संस्थापक आत्माराम नरसो भावे. (लेखन – जयंत गंगाधर भावे, दापोली.)**

रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील 'कळंबुशी' हे नदीकिनारी, डोंगरांच्या रांगेत वसलेले एक छोटेसे गाव! या गावात भावे यांची आठ घरे होती. म्हणून कळंबुशी गावात 'भावे वठार' म्हणून प्रसिद्ध होते. याच गावात श्री. आत्माराम नरसो भावे यांचा सन १८६४ मध्ये जन्म झाला. श्री. आत्माराम यांचे वडील सांगलीला मामलेदार होते. परंतु वडिलांचे अकाली निधनामुळे श्री. आत्माराम यांना स्वगृही म्हणजेच कळंबुशी येथे परत यावे लागले. रत्नागिरी जिल्ह्यात फक्त रत्नागिरी येथेच इंग्रजी शिक्षणाची सोय असल्याने त्यांना रत्नागिरी येथे येऊन शिक्षण घ्यावे लागले. त्यावेळी रत्नागिरी येथे मॅट्रिकचे परीक्षा केंद्र नसल्यामुळे त्यांना मुंबईला जाऊन मॅट्रिकची परीक्षा द्यावी लागली. मॅट्रिक परीक्षेत




ते उत्तम प्रकारे मार्कस् मिळवून पास झाले. त्यानंतर ते विल्सन कॉलेजमध्ये दाखल झाले. पण स्वतंत्र व्यवसाय करण्याकडे त्यांचा कल असल्याने विल्सन कॉलेजमधील शिक्षण सोडून ते कळंबुशी येथे परत आले.

काही सहकाऱ्यांचे मदतीने त्यांनी चिपळूण येथे एक इंग्रजी शाळा काढली. शाळेतील शिक्षण उच्च दर्जाचे असल्याने ही शाळा लवकरच नावारूपास आली. नंतर हीच शाळा परशुराम एज्युकेशन सोसायटीची 'युनायटेड इंग्लिश स्कूल' या नावाने ओळखली जाऊ लागली. नंतर ३-४ वर्षात त्यांचे संस्थाचालकांशी मतभेद निर्माण झाल्याने त्यांनी संस्थेचा राजीनामा दिला व ते कळंबुशी येथे परत आले. स्वत:चा स्वतंत्र व्यवसाय असावा व इंग्रजांची चाकरी करू नये असे त्यांचे मत होते. म्हणून 'पॉवरलूम' घ्यावे का? ते कसे आणावे? व कोठे व्यवसाय करावा? असे असंख्य प्रश्न त्यांना भेडसावत होते. अखेर कळंबुशी येथेच पॉवरलूम बसविण्याचे त्यांनी नक्की केले व मुंबईला जाऊन ती विकत घेण्याचे ठरविले. गावातील लोकांना रोजगार मिळेल व घरी मुलांनाही व्यवसायात भाग घेता येईल अशी दूरदृष्टी ठेवून त्यांनी कळंबुशी येथे चार पॉवरलूम्स बसविण्याचे नक्की केले. मात्र विणकाम व रंगकाम याची माहिती या व्यवसायाला आवश्यक असल्याने त्यांनी आपला मुलगा महादेव (तात्या) याला विणकाम व रंगकाम याचे शिक्षण घेण्यासाठी मुंबईत पाठविले. तसेच मोठा मुलगा नरसू (बापू) याला देखील पॉवरलूम कसे चालवायचे, त्याची दुरुस्ती कशी करायची, याचे स्पेअरपार्टस् कोठे मिळतील या सर्वांचा अभ्यास करण्यासाठी व शिक्षण घेण्यासाठी मुंबईत पाठविले. या दोघा भावांनी आपापले शिक्षण पूर्ण केल्यानंतर चार पॉवरलूम्स व एक कांडी मशीन घेण्याचे नक्की झाले. त्याकाळी वाहतुकीची साधने उपलब्ध नसल्याने त्यांनी कळंबुशीहून दोन बैलगाड्या मुंबईत पाठविल्या व त्यामधून सर्व सामान आणले. श्री. बापू व तात्या यांनी कळंबुशीचे घरात चार पॉवरलूम्स व एक कांडी मशीन बसविले. त्यावेळी वीज नव्हती म्हणून ३.५ एच. पी. चे एक इंजिन घेतले आणि


(पान क्र ५ वर)

## Unsung Heros
## गाऊ त्यांना आरती!

© **मोहित प्रमोद भावे, नागपूर.**

**जून घराण्यातील बडोदा शाखेतील, जलवितरण तज्ज्ञ, स्व. प्रा. प्रमोद रघुनाथ भावे. बी.ई.(सिव्हिल), एम.ई.(सिव्हिल), पीएच.डी.**

प्रा.प्रमोद रघुनाथ भावे यांचा जन्म सुरत येथे २४ फेब्रुवारी १९३२ रोजी झाला. त्यांचे वडील रेल्वेत कार्यरत होते. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गुजरातेत आणंद, भरुच, बडोदा येथे झाले. त्यांनी १९५३ मध्ये पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.ई. (सिव्हिल) ही पदवी प्राप्त केली. त्यानंतर दोन वर्षे त्यांनी सरकारी खात्यात कार्य केले. त्यानंतर १९५६ मध्ये ते महाराज सयाजीराव विद्यापीठ, बडोदा येथे लेक्चरर म्हणून रुजू झाले. तेथेच त्यांनी एम.ई.(सिव्हिल) ही पदवी प्राप्त केली. १९६२ मध्ये ते विश्वेश्वरय्या प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालय येथे उप प्राध्यापक (असिस्टंट प्रोफेसर) म्हणून रुजू झाले. तेथेच त्यांनी आचार्य (पीएच.डी.) ही पदवी प्राप्त केली. तेथूनच ते १९९२ मध्ये प्राध्यापक व डीन (ॲडमिनिस्ट्रेशन) म्हणून निवृत्त झाले.






त्यांनी वॉटर डिस्ट्रीब्यूशन सिस्टिम्स (जल वितरण प्रणाली) या विषयात उच्च प्रतीचे संशोधन कार्य केले आहे. त्यांचे दीडशेहून अधिक शोधप्रबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित झालेले आहेत. त्यात 'अमेरिकन सोसायटी ऑफ सिव्हिल इंजिनियर्स', 'टेलर एण्ड फ्रान्सिस' यासारख्या अतिशय प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या नियतकालिकांचा (जर्नल्स) समावेश आहे. त्यांच्या कार्याकरिता त्यांना इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे 'सर आर्थर कॉटन सुवर्ण पदक', 'श्रीमती सरोमा सन्याल स्मृती पुरस्कार' तसेच इंडियन सोसायटी ऑफ हायड्रॉलिक्स, इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन यासारख्या संस्थांकडून बरीच बक्षीसे व पुरस्कार मिळाले.

त्यांना युनेस्कोची फेलोशिप मिळाली होती व त्या अंतर्गत त्यांनी १९६७ - ६८ मध्ये सहा महिन्यांसाठी अमेरिकेच्या विविध विद्यापीठांना भेटी दिल्या होत्या. तसेच हाँगकाँग, जपान मधील काही विद्यापीठांचा अभ्यास दौरा केला होता.

त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी मराठीतून लिहिलेल्या 'तांत्रिक लेखन'( टेक्निकल रायटिंग) या पुस्तकाला १९७७ साली महाराष्ट्र शासनातर्फे राज्य पुरस्कार मिळाला आहे. त्यांनी सह-लेखकासोबत मराठीतून 'जल यांत्रिकी व द्रविकी' (फ्लूईड मेकॅनिक्स एण्ड हायड्रॉलिक्स) या विषयावर दोन खंडांमध्ये पुस्तक लिहिले. स्वत:च्या शोधकार्याच्या आधारावर त्यांनी 'वॉटर डिस्ट्रीब्यूशन सिस्टिम्स' या विषयावर नागपूर विद्यापीठात अभ्यासक्रम सुरू केला व त्या विषयावर १९९१ मध्ये पुस्तक लिहिले व ते अमेरिकेत प्रकाशित झाले. सह-लेखकाला बरोबर घेऊन त्याचीच नवीन आवृत्ती २००६ मध्ये भारत व युके मध्ये प्रकाशित झाली. 'ऑप्टीमल डिझाईन ऑफ वॉटर डिस्ट्रीब्यूशन नेटवर्क' हे पुस्तक त्यांनी २००३ मध्ये लिहिले, तर २०११ मध्ये त्यांनी 'वॉटर रिसोर्सेस सिस्टिम्स' हे पुस्तक लिहिले. पूर्वी जेव्हा संगणक नव्हता तेव्हा केवळ कॅलक्युलेटर वापरून वॉटर डिस्ट्रीब्यूशन सिस्टीम डिझाईन करण्याची पद्धत त्यांनी विकसित केली व त्यावर अमेरिकेत शोध प्रबंध प्रकाशित केला.

त्यांनी कन्सल्टींग इंजिनिअर म्हणूनही कार्य केलेले आहे, त्यात महाराष्ट्रातील बऱ्याच जल वितरण योजनांचा समावेश आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली बऱ्याच विद्यार्थ्यांनी एम.ई. व आचार्य (पीएच.डी.) ही पदवी प्राप्त केली आहे. निवृत्तीनंतरही त्यांनी बऱ्याच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

त्यांना खेळांची आवड होती. विशेषत: क्रिकेट आणि बॅडमिंटन या खेळांमध्ये त्यांना विशेष रुची होती. क्रिकेटचे सामने ते टीव्हीवर आवर्जून बघत असत. तसेच पत्त्यांमधील ब्रीज हा खेळ त्यांना आवडत असे व दर रविवारी दुपारी सहकाऱ्यांसोबत ते ब्रीज खेळत असत. त्यांना भारतीय शास्त्रीय संगीत ऐकण्याचा नाद होता व त्याची उत्तम जाण होती. संस्कृत भाषेतील सुभाषिते त्यांना अवगत होती व सुभाषितमालांच्या पुस्तकांचा संग्रह केला होता. ज्या देशांना त्यांनी भेटी दिल्या त्या देशातील नाणी त्यांनी संग्रहित करून ठेवली होती. त्यांची चरित्र विषयक माहिती अमेरिकेतील मार्क्विस या ग्रंथाच्या नवव्या आवृत्तीत (१९८८-९०) प्रसिद्ध झालेली आहे.

त्यांचे २८ सप्टेंबर २०११ रोजी नागपूर येथे निधन झाले. नागपूरच्या विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थेत त्यांच्या नावाने दरवर्षी पदवीपूर्व आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी एक एक पुरस्कार दिला जातो, तसेच इंडियन वॉटर वर्कस् असोसिएशनच्या नागपूर शाखेने त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ वार्षिक व्याख्यान ठेवले आहे व दरवर्षी जलक्षेत्रातील तज्ज्ञाला व्याख्यान देण्यासाठी बोलविले जाते.

⌘⌘⌘

**संपर्क :** २०१, उत्कर्ष विशाखा अपार्टमेंट,
४२, बजाजनगर, नागपूर ४४००१० **भ्रमणध्वनी :** ९८५०३०२४७५

(पान ४ वरून)

कळंबुशी येथे सन १९१५ साली चैत्र पाडव्याच्या सुमूहर्तावर कारखाना सुरू केला. पंचक्रोशीतील बरीचशी मंडळी हा कारखाना बघण्यासाठी येत असत. कारखान्यात त्यावेळेस लुगडी, पातळे, धोतर, रेशमी कद (सोवळे), शर्टींग इत्यादी उत्पादने घेण्यास सुरुवात केली. गावातील बऱ्याच मुलांना त्यांनी पॉवरलूम चालविण्यास शिकविले व त्याकाळात छोट्या गावात रोजगार उपलब्ध करून दिला. सदर उत्पादनांना जिल्ह्यातील लोकांकडून चांगली मागणी येऊ लागली. पक्क्या रंगाचे उत्तम कापड काढण्याबाबत या कारखान्याचा लौकिक झाला होता. आत्मारामपंतांचे वयाच्या ६०व्या वर्षी निधन झाले. मात्र श्री. नरसू व श्री. महादेव या त्यांच्या दोन्ही मुलांनी हा व्यवसाय पुढे चांगल्या रितीने चालविला. नरसोपंतांचे मोठे चिरंजीव गंगाधर (अप्पा) यांचा जन्म १९१६ सालचा. तेही इंग्रजी शिक्षण घेऊन घरच्या पॉवरलूम व्यवसायात लक्ष देऊ लागले. त्यांनी सन १९४८ पर्यंत हा व्यवसाय खूप भरभराटीस आणला. रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या इयत्ता ४ थी मधील भूगोलाचे पुस्तकात 'कळंबुशीची भावे गिरण' या नावाने एक धडा होता. **म. गांधींच्या 'खेड्याकडे चला' या हाकाटीला आत्मारामपंतांचा कळंबुशीचा हा कापडाचा कारखाना हे योग्य उत्तर नव्हे काय ?**

## Unsung Heros
## गाऊ त्यांना आरती!

**© अभय शंकर भावे, पुणे.**

**गुहागर घराण्यातील दिवाणबहादूर महादेव अनंत भावे यांचे धाकटे चिरंजीव विनायक महादेव भावे.**

त्यांचा जन्म १९२१ साली झाला. कॉलेजमध्ये उत्तम वक्ता म्हणून ते प्रसिध्द होते. १९३८ साली दिल्ली येथे होणाऱ्या आंतरकॉलेजीय चढाओढीत भाग घेण्यासाठी मुंबईतील रामनारायण रुईया कॉलेजने त्यांना पाठविले होते. त्यांनी त्या स्पर्धेत बक्षिसाचा चषक मिळविला होता. या यशाचे कौतुक म्हणून रामनिवास रुईया यांनी त्यांना सोन्याचे पदक भेट दिले होते. परीक्षा अगदी जवळ आली असताना सुध्दा त्यांनी या स्पर्धेत भाग घेतला व इंटरच्या परीक्षेतही ते दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण होऊन कॉलेजमध्ये पहिले आले. १९३९ सालीही कॉलेजने त्यांना पुन्हा या स्पर्धेसाठी पाठविले. यावेळीही त्यांनी कॉलेजचा पहिला नंबर आणून चषक कायम राखला. या स्पर्धेत विनायकराव सर्व उमेदवारात पहिले आले, त्यामुळे त्यांना वैयक्तिक चषकही मिळाला. या वेळी दिल्लीच्या महाराष्ट्र मंडळाने त्यांचा सत्कार केला. कॉलेजच्या सर्व चळवळीत पूर्ण आस्थेने ते भाग घेत असत. कॉलेजच्या स्नेह संमेलनाच्या वेळी होणाऱ्या इंग्रजी, मराठी नाटकात कामे करून त्यांनी पारितोषिके मिळविली आहेत. त्यांना मर्दानी खेळही आवडत असत. वकीलीचे शिक्षण पूर्ण केलेल्या विनायकरावांनी त्यावेळी अभिरूप न्यायालये गाजविली.

मुंबईत फेब्रुवारी १९४६ मध्ये झालेले नाविकांचे बंड इतिहासात प्रसिध्द आहे. या बंडातले विनायकरावांचे योगदान महत्त्वाचे होते. गोवा मुक्ती संग्रामात मधू दंडवते, मोहन रानडे, डॉ. मस्कारेहान्स यांचे समवेत विनायकरावही तुरुंगवासात होते. प्रकृतीने भक्कम असलेल्या विनायकरावांचा पोर्तुगीजांनी तुरुंगात असताना शारीरिक छळ केला. हातपाय बांधून छातीवर मुसळीने घाव घातल्याने बरगड्यांना गंभीर इजा पोहोचली, ज्यामुळे पुढे त्यांना कायमस्वरूपी दुखणे लागले.

दैनिक मराठामध्ये संपादकीय जबाबदारी पार पाडत असताना संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलन काळात विनायकराव मागे नव्हते. कम्युनिस्ट पक्षाचे भारतातील थिंकटँक म्हणून त्यांनी श्रीपाद अमृत डांगे, गोदूताई परुळेकर, बी.टी.रणदिवे यांचेबरोबर काम केले. स्वातंत्र्यसैनिक असलेल्या विनायकरावांनी कधी मानधन वगैरेसाठी अर्ज केला नाही. चळवळीतल्या बुध्दिवंतांचे जे होते तेच विनायकरावांचे झाले. हिंदू कॉलनी आणि माटुंगापर्यंतच्या पट्ट्यात त्यांच्या मालकीच्या जागा होत्या. पण ते व्यवहारी नसल्याने त्या मातीमोल भावात विकल्या गेल्या किंवा अन्य कोणाकडून तरी बळकावल्या गेल्या.

मुंबईत असे एकही पोलीस स्टेशन नसेल की जेथील डायरीत विनायकरावांच्या विविध आंदोलन काळातील अटकेची नोंद नसेल. पोलीस दप्तरी त्यांची नोंद वाँटेड, अंडरग्राऊंड अशी होती.

स्पॅनिश पाद्री फादर फेररचे त्यावेळी नगर-मनमाड-नाशिक पट्ट्यात उपद्व्याप खूप वाढले होते. गरिबांसाठी शाळा वगैरे सुरू करीत असल्याचे दाखवत प्रत्यक्षात धर्मांतर केले जात होते. इतकेच नव्हे तर नाशिक जिल्ह्यात राजकीय हस्तक्षेप करीत पंचायत समित्यांचे सभापती, सदस्य ठरविण्यापर्यंत या फादर महाशयांची मजल गेली होती. हे सर्व प्रकरण शोधपत्रकारिता करीत विनायकरावांनी दै. मराठातून लावून धरले, इतकेच नव्हे तर फादरकडे दारुगोळा व शस्त्रास्त्रे असल्याचे पुरावेही पुढे आणत फादरचा झगा फाडला. अखेर फादरला भारतातून गाशा गुंडाळत मायदेशी जावे लागले.

विनायकरावांच्या आजारपणाच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांची दादा देशपांडे यांनी व्यक्तीशः भेट घेऊन विनायक भावेंना आर्थिक मदत मिळवून दिली.

उतारवय व आजारपणामुळे प्रतिकूल आर्थिक परिस्थितीशी त्यांना संघर्ष करावा लागला. एकाच वेळी अनेक क्षेत्रात पराक्रम करणाऱ्या आचार्य अत्रेंसारख्या पहाडी व्यक्तीमत्त्वाच्या संपादकाचा हा राईट हँड मॅन देखील तितकाच तोलामोलाचा होता यात शंकाच नाही. त्यामुळेच त्यांच्या निधनानंतर वर्तमान पत्रातील बातमीचा मथळा 'दैनिक मराठामधील सेकंड इन कमांड विनायक महादेव भावे यांचे निधन' असा होता.

त्यांच्या पत्नी नलिनी यांनी कष्ट उपसत त्यांना मोलाची साथ दिली. वेगवेगळ्या रंगीत कागदांपासून सुंदर फुले तयार करून त्या विकायच्या. फार चांगली सौंदर्यदृष्टी त्यांना लाभली होती. शांत व मनमिळावू स्वभावाच्या नलिनीबाईंनी आपल्या पतीला त्यांच्या गुणदोषांसकट स्वीकारले होते. त्यांनी जणू एका वादळाशीच लग्न करून संसार थाटला होता. विनाअपत्य असलेल्या विनायकरावांच्या निधनानंतर नलिनीबाईंना त्यांच्या भाच्यानेच शेवटपर्यंत सांभाळलं.

---

## नवरात्र अष्टमीचे गाणे

**ॲड. पल्लवी पराग भावे, चिपळूण.**

चाल – राधा रुसली सुंदरी किंवा माझ्या सुंद्रीच लगीन

अंबे खेळ गं घागर  
पैंजणाचे झंकार तुझ्या  
खेळ गं घागर ।। ध्रु ।।

माती, वन्ही, जल आकारी  
वारा पोकळी अंतरी  
पंचमहाभूतांची घागर  
घडविली सुंदर ।।१।।

सरली सांज ही कातर  
रात्र येईल हळूवार  
धावत ये सत्वर  
साऱ्या घुमवूया घागर ।।२।।

मखर सजले मंदिरी  
नाद घुमला गाभारी  
मार चैतन्य फुंकर  
धूप घमघमला चौफेर ।।३।।

ऋतू शरदाची आली स्वारी  
हस्त झुलतो दरबारी  
झेलत हाती घागर  
आम्ही घालतो जागर ।।४।।

**संपर्क :** व्यंकटेश बंगला, गांधीनगर, मार्कंडी, चिपळूण ४१५६०५ **भ्रमणध्वनी :** ९९२२९१९७८८

# भावे शिक्षण निधी

**शिष्यवृत्ती/पारितोषिके देण्यासाठी अर्ज पाठविण्यासंबंधीचे निवेदन**

भावे शिक्षण निधीतून, चित्पावन भावे कुलातील होतकरू/गरजू व गुणवान शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनींना पारितोषिके व शिष्यवृत्ती द्यावयाची आहे. तरी चालू शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असलेल्या कौशिकगोत्री, भावे कुलोत्पन्न विद्यार्थी, विद्यार्थिनींनी किंवा त्यांच्या पालकांनी मार्कलिस्ट व ॲडमिशन पावती व बँक पासबुकाच्या पहिल्या पानाच्या झेरॉक्ससह सोबत दिलेल्या नमुना अर्जाप्रमाणे, खाली दिलेल्या पत्त्यावर दि. ३० नोव्हेंबर, २०२२ पर्यंत अर्ज पाठवावेत. अर्ज ई-मेलने केला तरी चालेल. अर्जातल्या माहितीमध्ये विद्यार्थी/विद्यार्थिनीचा बँक अकाऊंट नंबर, बँकेचे नाव, बँकेची शाखा, अकाऊंटचे नाव आणि IFSC No द्यावा ही विनंती. ज्यांना अधिक आर्थिक मदतीची गरज आहे त्यांनी आपला वार्षिक आर्थिक उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत जोडावा.

**पोस्टाने किंवा कुरियरने अर्ज पाठविण्यासाठी पत्ता –** १) अध्यक्ष, भावे मित्र मंडळ, १२४४, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४

**अर्ज ई-मेलने पाठविण्यासाठी ई-मेल ॲड्रेस**

**१) अभय शंकर भावे, पुणे.** bhave1956@gmail.com **२) जयंत गंगाधर भावे, दापोली.** jayantbhavedapoli@gmail.com

## भावे शिक्षण निधीविषयी काही ...

भावे शिक्षण निधीच्या आवाहनाकडे गांभीर्याने पाहाणे आवश्यक आहे. असे लक्षात आले की शिक्षण निधीतून मिळणाऱ्या रकमेची काहींना गरज होती पण...

एक शंका चर्चेतून समोर आली की आम्ही एकदा अर्ज केला होता, शिक्षण निधीतून प्रत्येक वर्षी रक्कम मिळेल का? या संदर्भात मुद्दाम येथे काही खुलासा दिला आहे.

**१) शिक्षण निधीतून दिली जाणारी रक्कम ही शिष्यवृत्ती, पुरस्कार या स्वरूपाची असते. त्यामुळे ही शिष्यवृत्ती/पुरस्कार मिळण्यासाठी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी अर्ज करावेत.**

**२) गरजू विद्यार्थी, विद्यार्थिनी यांना आवर्जून रक्कम दिली जाते, शिक्षण पूर्ण होईपर्यंत दर वर्षी अर्ज केल्यास प्रत्येक वर्षी रक्कम दिली जाते.**

**३) विशेष गुणवत्ता मिळालेल्या विद्यार्थी, विद्यार्थिनींचाही भावे शिक्षण निधीतर्फे पुरस्कार देऊन गौरव केला जातो. आपण सर्व पालक याकडे दुर्लक्ष करतो आणि आपल्याला याची काहीही गरज नाहीये असे ठरवतो, त्यामुळे अर्ज करत नाही. पण भावे मित्र मंडळाकडून आपल्या मुलामुलींचे कौतुक केले जात आहे असा विचार करून पाहावा म्हणजे आपण नक्कीच अर्ज करायचा विचार कराल असे वाटते.**

**४) आपल्या माहितीच्या चित्पावन कौशिकगोत्री भावे कुलातील कोणालाही याची माहिती देऊन त्यांनाही अर्ज करायला उद्युक्त करावे.**

**त्यामुळे तुम्ही नक्कीच याबाबतीत सकारात्मक विचार कराल अशी अपेक्षा.**

## भावे शिक्षण निधीसाठी करायचा नमुना अर्ज

प्रति,
अध्यक्ष, भावे मित्र मंडळ, भावे शिक्षण निधी, पुणे.
महोदय,

मी माझ्या पाल्यासाठी भावे शिक्षण निधीतून शिष्यवृत्ती/पुरस्कार मिळावा म्हणून अर्ज करीत आहे. सोबत आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या झेरॉक्सप्रती जोडल्या आहेत. माझ्या अर्जाचा विचार व्हावा ही विनंती.

आपला

पालकांची सही

**माहिती**

१) विद्यार्थ्याचे पूर्ण नाव ____________

२) पालकांचे पूर्ण नाव ____________

३) पत्ता (पिनकोडसह) ____________

____________

____________

पिनकोड ________ फोन नं ________

४) शिक्षणाचे वर्ष आणि गुणांची टक्केवारी ____________

५) अकाऊंट होल्डरचे नाव ____________

६) बँकेचे नाव व शाखा ____________

७) बँक अकाऊंट नंबर ____________

८) IFSC No. ____________

**सोबत जोडलेली प्रमाणपत्रे –**

☐ १) वार्षिक परीक्षेत मिळालेल्या गुणांची झेरॉक्स.

☐ २) पुढील वर्षात प्रवेश घेतल्याची फी भरल्याची पावतीची झेरॉक्स.

☐ ३) ज्यांना अधिक आर्थिक मदतीची गरज आहे त्यांचा वार्षिक आर्थिक उत्पन्नाचा दाखला.

✻ जी प्रमाणपत्रे जोडली असतील त्या समोरच्या चौकोनावर खूण करावी.

**✻ बँक अकाऊंट विद्यार्थ्याच्या नावानेच असावा.**



## 'भावे-प्रयोग'मध्ये द्यायच्या जाहिरातींचे दर

पाव पान रु. ५,००/- अर्धे पान रु. १,०००/- पूर्ण पान रु २,०००/-
संपूर्ण अंक प्रायोजकत्त्वाचे रु. १०,०००/-
रंगीत आवृत्तीचे दर दुप्पट राहतील.

आपल्या व्यवसायाची जाहिरात भावे-प्रयोगमध्ये जरूर द्यावी ही विनंती.

## Unsung Heros
## गाऊ त्यांना आरती!

**© अजित श्रीकृष्ण भावे, पुणे.**

**अडूर घराण्यातील, सांगली शाखेतील सांगलीच्या आयर्विन पुलाचे शिल्पकार कै. वासुदेव गणेश भावे. (बी.ई.)**

सांगलीतील भव्य, भक्कम व अतिशय देखणे असे शिल्प म्हणजे कृष्णा नदीवरचा आयर्विन पूल. शंभरीकडे वाटचाल करणारा हा सेतू उभारण्याचे शिल्पकार आहेत सांगली संस्थानचे पहिले इंजिनियर वासुदेव गणेश भावे. ते माझे आजोबा होते.

त्यांचा जन्म १८९१ सालचा. त्यांचे शालेय शिक्षण सांगली येथे झाले. वासुदेवरावांची हुषारी ओळखून राजेसाहेबांनी पुढील शिक्षण घेण्यासाठी त्यांना पुण्याला पाठविले. इंजिनियरिंग कॉलेजमधून ते उत्तम गुण मिळवून बी.ई. झाले. त्यांना क्रिकेट, फुटबॉल, हॉकी, टेनिस खेळांची आवड होती. खेळातील प्राविण्याबद्दल अनेक बक्षिसेही त्यांनी मिळविली होती.

डिग्री घेऊन आल्यावर लगेचच राजेसाहेबांनी सांगली संस्थानचे मुख्य इंजिनियर म्हणून त्यांची नेमणूक केली. सांगली संस्थानचे पहिले इंजिनियर म्हणून त्यांना योग्य तो सन्मान प्राप्त झाला. नेमणूकीच्या पहिल्याच दिवशी त्यांनी राजवाड्यात स्वत:चे ऑफिस थाटले. अतिशय देखणे, तेजस्वी आणि रुबाबदार व्यक्तिमत्व लाभलेले वासुदेवराव कामातही प्रामाणिक, शिस्तप्रिय व काटेकोर होते. त्यामुळे त्यांच्या विषयी आदरयुक्त दरारा लोकांच्या मनात निर्माण झाला.

योगायोगाने त्याच वेळी ब्रिटीश गव्हर्नरने त्यांचेकडे कृष्णा नदीवर पूल बांधण्याची जबाबदारी सोपविली. त्यांनी बारकाईने अभ्यास करून पुण्यातील रानडे कन्स्ट्रक्शनशी संपर्क केला. कमानी किती असाव्यात, खांबांचे आकार व माप किती असावे, दगड कोणता वापरावा या संबंधी विचार विनिमय केला. पुल एकदम भक्कम, दणकट व देखणा झाला पाहिजे या सर्वांचा स्थापत्यशास्त्रीय दृष्टीकोनातून सखोल अभ्यास केला. १९२७ ते १९३० या कालावधीत पुलाचे बांधकाम पूर्ण झाले. आयर्विन पूल असे त्याचे नामकरण झाले. वाहतुकीची उत्कृष्ट सोय झाली. ही त्यांची अभूतपूर्व कामगिरी. सांगलीच्या कृष्णा नदीवरील आयर्विन पूल हा त्यांच्या स्थापत्यशास्त्रविषयक ज्ञानातील प्राविण्य दर्शविणारा आहे. अस्खलित इंग्रजी बोलणे, आदबशीर वागणे या गुणांची कदर करून त्यांना राजेसाहेबांनी व ब्रिटिश गव्हर्नरने 'रावसाहेब' हा किताब बहाल केला. शिवाय 'व्हिक्टोरिया मेडल' व 'रावसाहेब' अशी अक्षरे कोरलेले एक सुरेख पदकही दिले. पंढरपूर ते मंगळवेढे रस्त्यावरील माण नदीवरही असाच एक पूल त्यांनी बांधला आहे.



आद्य नाटककार विष्णुदास भावे यांचे ते नातू. १९५० साली सांगलीच्या हरभट रोडवर 'भावे नाट्य मंदिर'या वास्तुची त्यांनी उभारणी केली. हे नाट्यगृह त्यांनी लोकार्पण केले. ह्या नाट्य मंदिराच्या उभारणीसाठी राजेसाहेबांनी जागा दिली व सढळ हाताने आर्थिक मदतही केली. भावे नाट्य मंदिराची स्थापना करून त्यांनी नाट्यकलावंतांना पुढे आणण्याची खटपट केली. नवे नाट्य कलावंत निर्माण व्हावेत अशी त्यांची इच्छा होती.

कृष्णाकाठी पुलाजवळ पशुपतीनाथ मंदिर व दत्त मंदिर अशी दोन मंदिरेही त्यांनी बांधली. आजही त्यांची देखभाल व्यवस्थित चालू आहे.

त्यांनी जरासंध वधावर एक नाटक लिहिले आहे. ते लघुकथाही लिहीत असत. बागबगीच्याचीही त्यांना आवड होती. गांधी हत्येत त्यांचे घर भस्मसात झाले. या परिस्थितीला धैर्याने तोंड देऊन त्यांनी स्वत:ची वास्तू पुन्हा अत्यंत भारदस्त स्वरूपात उभी केली. त्यांचे निधन २२-०७-१९६३ या दिवशी झाले.

⌘⌘⌘

**संपर्क :** बी ५, प्राईड व्हॅलेन्शिया, पॅनकार्ड क्लब रोड, बाणेर, पुणे ४११०४५ **भ्रमणध्वनी :** ९५११८९८०५२

**विशेष निवेदन** – भावे मित्र मंडळाकडे भावे व माहेरवाशीणींचे पत्ते व फोन नंबर्सचा जो डाटा आहे, तो २००७ सालचा आहे. त्यात होणारे बदल अपडेट करण्याचे काम सतत चालू असतेच. आपली नवीन पिढी नोकरी-व्यवसायामुळे अन्य ठिकाणी निवासाला गेली असल्यास त्यांचे पत्ते, भ्रमणध्वनी व ई-मेल अ‍ॅड्रेस मंडळाला जरूर कळवावेत म्हणजे भावे मित्र मंडळाचा डाटा अपडेट होईल. पत्ते, भ्रमणध्वनी व ई-मेल अ‍ॅड्रेस **पर्शराम भावे, पुणे. भ्रमणध्वनी ९४०३५१६८७५ व अभय शंकर भावे, पुणे. भ्रमणध्वनी ९४२२३०६०३३ यांना** Whats App **वर किंवा मेसेजने कळवावेत.**



६८ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये अनेक मराठी चित्रपट/कलावतांनी विविध पुरस्कार प्राप्त केले. **अनमोल अजय भावे** याने 'मी वसंतराव' या चित्रपटासाठी केलेल्या ध्वनी संयोजनासाठी सर्वोत्कृष्ट ध्वनी संयोजक असा पुरस्कार मिळवला आहे. आत्तापर्यंत अनमोलला तीन पुरस्कार मिळालेले आहेत.

**भावे मित्र मंडळातर्फे अनमोलचे हार्दिक अभिनंदन!!!**

## एका ट्रिपची गोष्ट - शांघायचे बूट पॉलिश

© आनंद वामन भावे, पुणे.

आमच्या ऑफिसच्या नरीमन पॉइंटवरील इमारतीचं ए.सी. प्लांट बदलायचं होतं. जुने छोटे-छोटे बारा-चौदा कॉम्प्रेसर काढून आधुनिक मोठ्या क्षमतेचे तीन कॉम्प्रेसर बसवायचे होते. कॅरियर कंपनीच्या शांघाय जवळील (वुक्सी किंवा वुशी येथील) कारखान्यात त्यांचं उत्पादन पूर्ण झालं होतं. मुंबईला पाठवायच्या आधी टेस्टिंग करायला मला व माझ्या बॉसना पाठवलं. टेस्ट यशस्वीरित्या पार पडल्यावर अर्धा-एक दिवस आम्ही खरेदी व स्थलदर्शन केलं.

त्यात मुख्य म्हणजे वुशीपासून पन्नासेक कि.मी. वरचा ग्रॅण्ड बुद्ध ऑफ लिंगशान. ८८ मीटर (२८९ फूट) उंचीची ही बुध्दमूर्ती खरोखरच बघण्याजोगी आहे. भोवती कित्येक एकरात सुंदर बाग आहे. पुतळ्याच्या पायाचा आंगठासुध्दा माणसापेक्षा उंच आहे. या बुध्दाखेरीज उंच स्तंभावर बसवलेला एक बुध्द आहे. याला दर दोन तासांनी अभिषेक करतात. तो कसा, तर स्तंभाभोवती मोठा हौद आहे, हौदाच्या भिंतीवर कारंज्यांचे नळ असे बसवले आहेत की दर दोन तासांनी स्वयंचलित यंत्रणेने बुध्दावर सर्व बाजूंनी मिनिटभर पाण्याचा अभिषेक होतो. अप्रतिम. चिनी राज्यकर्ते म्हणतातच की भारताने एकही सैनिक न पाठवता आमच्या पासष्ठ टक्के लोकांना बौध्द केले.

टेस्टिंग झाल्यावर शांघायचं फ्ली मार्केट (Flea Market) म्हणजे फूटपाथवरचे पथारीवाले यांना भेट दिली! बेडशीट, बेड कव्हर घेतलं. Mont Blanc (उच्चार म्हणे माँब्लाँ करायचा) ब्रॅण्डची बॉलपेन पंचवीस-तीस रुपयांत होती. ती हातवारे करत, भाव करून प्रत्येक ए.सी. प्लांट ऑपरेटर, इलेक्ट्रिशियन, इ. साठी घेतली. (नंतर कळले की त्या भावात माँब्लाँ मिळणे अशक्य. डुप्लिकेट असणार. पण पेनं चालत होती.) मॉलमधेही काही खरेदी केली. घरच्या प्रत्येकासाठी काहीतरी घेतलं.

हे सर्व आटोपल्यावर आमच्या कंपनीच्या शांघाय ब्रांचला भेट देणं भाग होतं. मी व बॉस तिकडे सकाळी गेलो. ऑफिस उघडायला वेळ होता, म्हणून शांघायची रहदारी बघत फुटपाथवर थांबलो. एका पेक्षा एक सुंदर कार्स... सर्व चमचमत्या, स्वच्छ, विविधरंग, मॉडेल्स, आणि जगातले अत्युत्तम ब्रॅण्ड एका रस्त्यावर!

तेवढ्यात... एक मळकट कपडे, केसांच्या झिंज्या, कधी आंघोळ केली असेल कोणास ठाऊक, अशी महिला बूट पॉलिशचा ब्रश नाचवत आमच्याजवळ आली. खुणेने पॉलिश करू का? विचारू लागली. मी नको सांगितलं. बॉसनं, 'किती घेणार?' विचारलं. तिनं दहा बोटं दाखवली. बॉसनं पाच दाखवल्यावर तिनं मान डोलावत पॉलिशला सुरुवात केली. पॉलिश झाल्यावर तिनं हात पुढे केला. बॉसनं पाच युआन (त्या वेळचे तीस रुपये) दिले. त्यावर ती, 'फाइव्ह यू एस डॉलर्स, फाइव्ह यू एस डॉलर्स.' असा आरडा ओरडा करू लागली व पाच युआनचं नाणं परत देऊ लागली. बॉससुध्दा, 'नो नो, फाइव्ह युआन ओन्ली' म्हणत ठाम होता. त्याचं बरोबर होतं. ज्या देशात आहोत तिथल्याच नाण्यात व्यवहार करणार. आणि चिनी तर त्यांच्या चलनाबद्दल केवढे आग्रही.

आणि जणू ठरवल्याप्रमाणे एक फाटक्या अंगाचा माणूस आला. तांबारलेले डोळे, चेहऱ्यावर गुर्मी. बाईशी बोलून त्यानं परिस्थिती समजून घेतली व बॉसकडे पाच डॉलर्स (त्यावेळचे तीनशे रुपये) मागितले. एव्हाना बाईनं पाच युआन खाली टाकून दिले होते. बॉसने नकार दिल्यावर बुवा खाली बसला. फुटपाथवरची धूळ गोळा केली (शांघायच्या फुटपाथवर धूळ होती बरं का!) ती बॉसच्या बुटांवर टाकून पॉलिश कॅन्सल केलं. पाच युआनचं नाणं उचलून बॉसच्या हातात आपटलं व जोडगोळी निघून गेली.

मी म्हणालो, 'सर, आपण आपले लिफ्ट लॉबीमध्ये उभे राहू या. आता ऑफिस उघडेलच.' आम्ही निमूटपणे इमारतीत गेलो.

⌘⌘⌘

**संपर्क :** ४, श्री अपार्टमेंट, ४९८ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३० **भ्रमणध्वनी :** ९९३०२८९३९८




**डॉ. श्रीकांत नारायण भावे** यांचा माणगाव येथील माणगाव मेडिकोज या डॉक्टरांच्या असोसिएशनने २०२२-२३ चा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान केला. १९९५ साली त्यांनीच या असोसिएशनची स्थापना केली होती. माणगाव पंचक्रोशीत डॉ.श्रीकांत भावे यांची आयुर्वेदाचार्य म्हणून ख्याती आहे व अनेक रुग्णांना त्यांच्या दुर्धर आजारात त्यांनी उपचार केले आहेत. सरकारी नोकरीनंतर १९७१ मध्ये त्यांनी माणगावात आपला वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. पाली येथेही ते आयुर्वेद व्यासपीठांतर्गत मोफत बाह्य रुग्ण सेवा देतात.

**भावे मित्र मंडळातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!!!**

## सहवेदना



**सौ. शामला विठ्ठल भावे, डोंबिवली**

यांचे दि. २६ जुलै २०२२ या दिवशी वयाच्या ८१ व्या वर्षी निधन झाले. गेली काही वर्षे त्या किडनी आणि स्मृतीभ्रंश या आजाराशी झुंजत होत्या.

त्यांच्या पश्चात पती विठ्ठल भावे, मुलगा अमित, दोन कन्या, जावई, नातू, नात असा परिवार आहे. पूर्वाश्रमीच्या शकुंतला विश्वनाथ लागू. त्यांचा जन्म पनवेल येथे दिनांक १४ जानेवारी, १९४१ ला झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण शिरढोण येथे झाले, त्यानंतरचे ७ वी पर्यंतचे शिक्षण बडोद्याला झाले. नंतर त्यांच्या आईच्या आजारपणामुळे त्यांना शिक्षण सोडून घरची जबाबदारी सांभाळावी लागली.

त्यांचा विवाह, श्री. विठ्ठल विश्वनाथ भावे (कळंबुशी) यांच्याशी दिनांक ६ फेब्रुवारी, १९६६ रोजी बडोदे येथे संपन्न झाला. लग्नानंतर आधी घाटकोपर आणि नंतर डोंबिवली येथे वास्तव्य होते. एक यशस्वी गृहिणी म्हणून त्यांनी ५६ वर्ष संसार केला. त्या अतिशय प्रेमळ आणि मनमिळावू अशा होत्या.

**त्यांच्या आत्म्याला सद्गती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.**

## सुशिक्षित सासुरवास

© आनंद वामन भावे, पुणे.

सून सांगे गोष्ट तिच्या भयंकर छळाची
ऐका देवा कथा सुशिक्षित सासुरवासाची ।।
सासू-सासरे पीएच.डी. तर नवरा बी.टेक.वाला
बी.ए.सून त्यांना वाटे अशिक्षित बाला ।।
सासूबाई काढून देती शिधा स्वैपाकाचा
सुनेनं तेवढ्याचाच स्वैपाक करायचा ।।
सासू-सासरे आणि नवरा चट्टामट्टा करिती
सुनेला जेवायला काही न ठेवीती ।।
आंघोळीला एकच बादली पाणी घ्यायचे
दात केस धुतानाही असेच करायचे ।।
नियमभंग झाल्यास बादली गायब होई
नवऱ्याकडूनही त्यांना कधी विरोध ना होई ।।
तरीही वीजबिल तोंडावर फडकविती
सुनेमुळे ज्यास्त आले, असे सांगती ।।
ज्याच्या विश्वासावर बायको येते सासरी
त्याची ही स्थिती तर देव काय करी ।।
सासरा प्राचार्य, तर नवरा अभियंता
प्राप्ती चांगली असूनही सर्वच कमतरता ।।
शेजाऱ्यांशी संबंध मुळीच ठेवायचे नाही
समोरचीशी बोलली, तर सासरा वटारून पाही ।।
गरोदरपणात लाड सोडा, धड जेवण नाही
ओकाऱ्या झाल्या तरी पटत नाही ।।
डोहाळे बिहाळे सगळं खोटं असतं
लक्ष वेधून घेण्यासाठी नाटक असतं ।।
चार महिन्याचा नातू आजारी पडला
इस्पितळात तिघांपैकी कुणी न थांबला ।।
ह्यांच्या आजारपणात मात्र कौतुक करायचं
ए.सी. खोली खेरिज यांना नाही चालायचं ।।
चार-पाच ऑपरेशनमध्ये सेवा केली
तोंडातून कौतुकाची पावती नच निघाली ।।
त्यांच्या साठीपासून पंच्याऐंशीपर्यंत सांभाळले
एकदाही उलट उत्तर नाही दिले ।।
इंग्रजी शाळा नातवासाठी होती मागील दारी
त्यांच्यामुळे लांबवरची मराठीच खरी ।।
करा तंगडतोड कारण शाळेला बस नव्हती
मुंबैत नव्हत्या रिक्षा, टॅक्सी परवडत नव्हती ।।
सोडायाला आणायाला दोन वेळा जा
दुसरे मूल झाल्यावर चार वेळा जा ।।
गोड नात झाली तरी मारिती टोमणा
सारखी मुले होतात, म्हणती जाणा ।।
सतत चालणे मात्र खाणे पिणे नाही
बेचाळीसचे चौतीस वजन देवा तूच पाही ।।
सासू-सासरे असे, नवरा कुठे बरा
जरा शब्द काढता, करी थपडांचा मारा ।।
विनाकारण आई-बाबांना बोलावून घेती
काय चुकले? विचारता उत्तर ना देती ।।
स्वैपाक चांगला, टापटीप घर, उलट उत्तर नाही
आमच्या मुलीबद्दल तक्रार काही?
माणुसकी नसलेले तीन नमुने असती
ह्याची जाणीव झाली लग्नउपरांती ।।

**संपर्क :** ४, श्री अपार्टमेंट, ४९८ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३० **भ्रमणध्वनी :** ९९३०२८९३९८

## काही वेगळे पौष्टिक खाद्यपदार्थ

© मृदुला उदय भावे, मुंबई.

### शिराळ्याच्या (घोसाळ्याच्या) शिरांची चटणी

**साहित्य -** तीन शिराळी, ५ चमचे पांढरे तीळ, ३ चमचे शेंगदाणे, ४ बुटुक चिंच, मीठ, ४ मिरच्या, २ चमचे तेल, साखर/गूळ (चवीप्रमाणे) ५ चमचे ओले खोबरे. **कृती -** प्रथम शिराळी स्वच्छ धुऊन घ्यावीत. त्याच्या वरच्या टणक शिरा सोलाण्याने काढून टाकून द्याव्यात. आतल्या शिरा वेगळ्या काढून घ्याव्यात. या शिरांचे तुकडे करून घ्यावेत. कढईत दोन चमचे तेल गरम करावे. त्यात या आतल्या काढलेल्या शिरा घालाव्यात. तेलावर चांगल्या परतून घ्याव्यात, शिजण्याकरता झाकण ठेवावे. या शिरा परतत असताना त्यात तीन मिरच्यांचे तुकडे घालावे. तीळ व शेंगदाणे घालावेत. तेही चांगले परतून घ्यावे. साधारण आठ ते दहा मिनिटे हे दोन्ही पदार्थ खरपूस परतल्यावर थंड होऊ द्यावे. आता मिक्सरच्या भांड्यात परतलेल्या शिरा, मिरच्या, चिंच, मीठ, साखर/गूळ, (आपल्या आवडीनुसार) पाच चमचे ओले खोबरे घालून चटणी बारीक वाटून घ्यावी. आवडत असल्यास वरून मोहोरी, हिंग, हळदीची फोडणी द्यावी.

भाज्यांच्या सालांमध्ये जीवनसत्वे असतात त्यामुळे ही चटणी चविष्ट आणि पौष्टिक आहे.

### मसाला दुधी

आपण दुधीची भाजी पारंपरिक पद्धतीने नेहमी करतो. आज थोडी वेगळी पद्धत. **साहित्य -** १ दुधी ३००-४०० ग्रॅम, पाव वाटी मूग डाळ, ३ चमचे ओला नारळ, २-३ चमचे सांबार मसाला, ४-५ कढीलिंबाची पाने, ३ चमचे तेल. **कृती -** भाजी करायच्या २ तास आधी मूग डाळ भिजत घालावी. दुधी स्वच्छ धुऊन घ्यावा. साल काढून चौकोनी फोडी करून घ्याव्यात. मिक्सरच्या भांड्यात ओले खोबरे, कढीलिंबाची पाने, सांबार मसाला बारीक वाटून घ्यावा. लहान कुकरमध्ये ३ चमचे तेल घालावे. तेल तापले की त्यात मोहोरी, हिंग, हळद घालावी. दुधीच्या फोडी घालून त्या फोडणीत परताव्या. त्यावर मूग डाळ घालावी. डाळ थोडी परतल्यावर त्यावर मिक्सर मधील वाटण घालून परतावे. चवी प्रमाणे मीठ घालावे. सर्व जिन्नस परतल्यावर अर्धी वाटी पाणी घालून कुकरची एक शिट्टी करावी व गॅस बंद करावा. आवडत असल्यास थोडा गूळ किंवा साखर घालावी. तिखट आवडत असल्यास फोडणीत १ लहान लाल मिरची घालावी. **कढीलिंब वाटणात घातल्यामुळे त्याचा आरोग्याला फायदा होतो.**

**संपर्क :** ४०३, सीता सदन, रूद्राक्ष, सांडू वाडी,
चेंबूर, मुंबई ४०००७१ **भ्रमणध्वनी** - ९२२०५६७८४५

# भावे मित्र मंडळ, एक परिवाराचा सदस्यत्त्व आणि स्वनिधीचा उपक्रम.

**'भावे मित्र मंडळ-एक परिवार'** ही संस्था २००६ मध्ये नोंदणीकृत झाली असून संस्थेचे सदस्य होण्यासाठी १८ वर्षांवरील सर्व कौशिक गोत्री चित्पावन भाव्यांनी मंडळाचे सदस्यत्व स्विकारावे असे आवाहन भावे मित्र मंडळाकडून वेळोवेळी केलेले आहे. याला प्रतिसाद म्हणून अनेकांनी अगदी लहानग्या मुलांसह सदस्यत्व स्विकारले आहे. **डिसेंबर २०१८ मध्ये उज्जैनला झालेल्या संमेलनातील निर्णयामुळे सदस्यत्त्वाची रक्कम आता एक हजार रुपये झाली आहे.**

जुलै, २००८ मध्ये झालेल्या भावे मित्र मंडळाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत भावे मित्र मंडळाचे कार्य पुढे नेण्यासाठी संस्थेचे सदस्य वाढविणे व स्वनिधी वाढविण्याबाबत खालील निर्णय झाले. १) शिक्षण व तत्सम सहकार्य, २) व्यावसायिक सहकार्य/ व्यवसायाकरिता कमी व्याजदरात भांडवल पुरविणे ३) वैद्यकीय कारणांसाठी सहकार्य, मोठ्या शस्त्रक्रियेसाठी मदत (परत बोलीच्या तत्वावर) ४) आपत्कालीन सहकार्य अशा कारणांसाठी आणि भावे मित्र मंडळाच्या कार्यालयीन व्यवस्थापनासाठी स्वनिधी जमवावा असे ठरले. **प्रत्येक कमावत्या व्यक्तीने रु. ५०००/- स्वनिधीसाठी द्यावेत** असे आवाहन केले गेले. यापेक्षा अधिक रक्कम दिल्यास स्वागतच आहे असेही आवाहन कार्यकारिणीने केले होते. त्यानुसार अनेकांनी स्वनिधीसाठी भरघोस निधी देऊन चांगला प्रतिसाद दिला. अनेकांनी एक रकमी रु.५०००/- देण्यास असमर्थता दर्शवल्याने रक्कम हप्त्याने स्विकारण्याचीही योजना समोर आली.

भावे मित्र मंडळाचे अध्यक्ष, श्रीवर्धन वामन भावे यांनी प्रत्येक भावे कुटुंबाकडून रु. १०००/-(रु. एक हजार फक्त) वार्षिक वर्गणी दरवर्षी घ्यावी असा प्रस्ताव ठेवला. या प्रस्तावाला अभय शंकर भावे यांनी अनुमोदन दिले. कुलबंधूंचे उपलब्ध असलेले संपर्क पाहता तीन हजारांपेक्षा अधिक कमावत्या व्यक्ती आहेत. **या आवाहनास मान देऊन अनेकांनी सदस्यत्त्व स्विकारले आहे, तसेच स्वनिधीही दिलेला आहे.**

**आपणही सदस्यत्त्वाची रक्कम रुपये एक हजार व वार्षिक वर्गणी रुपये एक हजार देऊ शकता किंवा खाली दिलेल्या बँक अकाऊंटमध्ये रक्कम ट्रान्सफर करावी अशी विनंती आहे.**

**बँकेचे डिटेल्स याप्रमाणे आहेत. Bank Name** - IDBI Bank, **Branch** - Deccan Gymkhana, Pune. **Account Name** - Bhave Mitra Mandal, **Saving A/C Number** - 50210010010723, **IFSC** - IBKL0000502. **रक्कम ट्रान्सफर केल्यावर अभय शंकर भावे यांना ९४२२३०६०३३ या क्रमांकावर किंवा** bhave1956@gmail.com **या मेलवर संपूर्ण नाव व पत्यासह कळवावे म्हणजे पावती मेलने पाठवता येईल.**

# भावे मित्र मंडळाचा एक उपक्रम - भावे शिक्षण निधी

भावे मित्र मंडळाच्या बैठकीत शिक्षण निधीच्या वाढीसंबंधी काय करता येईल याबद्दल नेहमीच विचार विनिमय चालू असतो.

पहिला कुलवृत्तांत सन १९४० मध्ये प्रकाशित झाला. त्यानिमित्ताने जो निधी शिल्लक उरला होता, त्या रकमेचा विनियोग कसा करावा या कल्पनेतून भावे शिक्षण निधीचा विचार पुढे आला. अनेक कुलबंधूंचे पाठिंब्याने 'भावे शिक्षण निधी'ची स्थापना झाली. जवळजवळ सत्तर वर्षे हे कार्य पहिला कुलवृत्तांतकर्ते गोविंद वासुदेव भावे व त्यांचे सहकारी, पुढे त्यांचे चिरंजीव मधुसूदन गोविंद भावे यांनी चालवले. भावे मित्र मंडळाची स्थापना झाल्यावर २००८ साली भावे शिक्षण निधी भावे मित्र मंडळात समाविष्ट झाला. त्यानंतर कामास थोडा वेग आला. आता मंडळाच्या द्वैमासिकातून दरवर्षी निवेदन दिले जाते व भावे कुलोत्पन्न गुणवान विद्यार्थ्यांना पुरस्कार, गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. असे असले तरी अजून मोठ्या प्रमाणात या निधीमध्ये भर पडल्यास, वाढत्या महागाईच्या काळात वाढलेल्या शिक्षण खर्चाची तोंडमिळवणी करणे शक्य होईल.

भावे शिक्षण निधीतून आजवर अनेक विद्यार्थ्यांना मदत मिळाली आहे. ही मदत 'फूल ना फुलाची पाकळी' अशा स्वरूपाची आहे हे मान्य केले तरी विद्यार्थ्यांना त्या त्या वेळी जी मदत झाली आहे त्याबद्दल अनेकांना कृतज्ञता वाटते व ते स्वाभाविकही आहे. ही मदत थोडी असली तरी आपल्या कुलाने प्रेमाने व आपुलकीने दिलेला तो प्रोत्साहनपर आशिर्वाद आहे ही भावना अनेक कुलबंधूंशी बोलताना लक्षात आली.

**ही भावना लक्षात घेता ज्या भावे कुल बंधू भगिनींना अशी मदत अल्पस्वल्पही का असेना, मिळाली आहे त्यांचेसाठी विनंती वजा आवाहन करीत आहोत की आता जे कुलबंधू आर्थिकदृष्ट्या स्थिरावले आहेत त्यांनी 'भावे शिक्षण निधी'स सहाय्य करून हा निधी वाढवण्याचे कामी पुढाकार घ्यावा. एक कल्पना अशी आहे की प्रत्येकाने दरवर्षीची योजना निश्चित करून तशी रक्कम तयार ठेवून ही रक्कम 'भावे शिक्षण निधी'स देणगीचे स्वरूपात द्यावी. आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने, लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने किंवा भावे मित्र मंडळाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्तानेही अशी योजना आपणास तयार करता येईल.**

अर्थात ज्यांनी विद्यार्थीदशेत या निधीतून काही सहाय्य घेतलेले नाही अशांनीही शिक्षण निधीस सहाय्य करण्यासाठी हे निवेदन आहे हे सांगणे नकोच. 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे हा निधी वाढीला लागेल असा विश्वास वाटतो. सर्वांनी मनावर घेतले तर हे काम सोपे होईल. 'केल्याने होत आहे रे ! आधी केलेचि पाहिजे !' अधिक काय लिहावे!

**अध्यक्ष, भावे मित्र मंडळ**

**शिक्षण निधीच्या देणगीची रक्कम आपल्याला बँकेच्या खात्यात डायरेक्ट जमा करता येईल. त्याचा तपशील खाली दिला आहे.**

**Bank Name -** Janata Sahakari Bank, **Branch -** Karve Road, Pune., **Account Name -** Bhave Mitra Mandal (Ek Pariwar) A/C Bhave Shikshan Nidhi, **Saving - A/C Number -** 007220100038846, **IFSC Code -** JSBP0000007

**रक्कम ट्रान्सफर केल्यावर पर्शराम भावे (९४०३५१६८७५) किंवा अभय भावे (९४२२३०६०३३) यांना कळविणे आवश्यक आहे.**

# सुलभ गायत्री यज्ञाची प्रक्रिया.

© हेमंत जोगळेकर, पुणे.

**यज्ञ संकल्पना :**

प्राचीन भारताची कल्पना करताच मंत्रोच्चारासह यज्ञ करणाऱ्या ऋषीमुनींचे चित्र डोळ्यांपुढे उभे रहाते. यज्ञ हे भारतीय संस्कृतीचे आद्य प्रतीक आहे. आपल्या संस्कृतीत वेदांचे जे महत्त्व आहे तेच महत्त्वपूर्ण स्थान यज्ञांना देखील प्राप्त झाले आहे. वेदातील जवळजवळ निम्मी सूक्ते ही यज्ञाशी संबंधित आहेत. यजुर्वेद हा संपूर्ण वेदच यज्ञ विषयाला वाहिलेला आहे. यज्ञाला वैदिक धर्माचा प्राण म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही.

सिंधू सरस्वती संस्कृतीच्या लोथल, राखीगढी येथील उत्खननात घरोघरी अग्निवेदी सापडल्या आहेत. त्यावरून घराघरांमध्ये यज्ञ केला जात होता हे देखील कळून येते. रामायण-महाभारत काळापासून ते ज्ञात इतिहासातील राजे महाराजांपर्यंत मोठमोठ्या यज्ञांची वर्णने किंवा उल्लेख शिलालेखांवर व लोककथांमध्ये सर्वत्र सापडतात.

आपल्या आजच्या जीवनात देखील उपनयन, विवाह आणि अंत्येष्टी या संस्कारात यज्ञ हा अविभाज्य रूपाने असतोच. मृत्यूनंतर मनुष्याचा देहच अग्नीला यज्ञ रूपात अर्पण केला जातो. उपनयनानंतर घालण्याचे जानवे - त्यालाही यज्ञोपवीत म्हणजे यज्ञाद्वारे संस्कार केलेले सूत्र असेच म्हणतात. विवाह संस्कार यज्ञाच्या साक्षीनेच पूर्ण होतो. खेड्यामधील स्त्रिया देखील चुलीवर अन्न शिजवून झाल्यावर चुलीतून निखारे बाहेर काढून त्यावर तूप भात इत्यादी समर्पित करून, भोवती चारी बाजुंनी पाणी फिरवतात व एक प्रकारे यज्ञाचे कार्यच करतात. आपल्या सणांपैकी होळी हा सण म्हणजे नवसस्येष्टी अर्थात नवीन धान्याचे स्वागत करण्याचा यज्ञच असतो. नवीन धान्य प्रथम यज्ञ भगवंताला अर्पण करून मगच संस्कारित अन्न ग्रहण करण्याचा श्रेष्ठ भाव होळीच्या सणामागे आहे.

वेदांमध्ये विविध शक्तीस्रोतांना देवतारूपाने उल्लेखिले असले तरी, परमेश्वर स्वयं निराकार आहे व तो मनुष्याच्या इंद्रियांच्या आणि मन-बुध्दीच्या पलीकडचा, आवाक्याबाहेरचा आहे, हे सत्य आपले वेद व उपनिषदे वारंवार सांगतात. विश्व ब्रम्हांडाच्या या विराट चैतन्याची पूजा-उपासना करण्यासाठी प्रखर तेजस्वी अग्नी हाच ऋषींनी योग्य मानला. **अग्निमीळे पुरोहितम्** या ऋग्वेदातील पहिल्या सूक्तापासून अग्नीला ईश्वराच्या रूपात मानले आहे. **अग्ने नया सुपथा राये अस्मान्** या मंत्रात अग्निकडे आपल्याला योग्य मार्गावर घेऊन जाण्याची प्रार्थना केली आहे. हाच भाव गायत्री मंत्राच्या **धियो यो नः प्रचोदयात्** आमच्या बुद्धीला सन्मार्गावर प्रेरित करा या पदामध्ये आहे.

**गायत्री यज्ञ :**

साक्षात परमेश्वरी शक्तीचे प्रतीक असलेला यज्ञ व सद्बुध्दीची प्रार्थना करणारा गायत्री मंत्र या दोन्हींची सांगड घालून यज्ञामध्ये गायत्री मंत्राच्या आहुती देऊन करण्याच्या गायत्री यज्ञाचा प्रचार हरिद्वारच्या गायत्री परिवार या संस्थेने १९४० सालापासून मोठ्या प्रमाणावर सुरू केला. गायत्री परिवाराचे जनक पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांनी स्वत: गायत्री मंत्राची चोवीस लक्ष जपाची, चोवीस महापुरश्चरणे केल्यानंतर गायत्रीची प्रचंड प्राण ऊर्जा व यज्ञाची आध्यात्मिक चेतना यांच्या समन्वयातून समाजात नवजागृतीची लाट निर्माण करण्याचा संकल्प केला. घराघरात सांस्कृतिक पुनरुत्थानासाठी १९५८ साली मथुरेमध्ये १००० यज्ञकुंडांचा विराट गायत्री यज्ञ संपन्न केला. या यज्ञानंतर जागृतीची एक लाट येऊन भावनगर, महासमंद, जमशेदपूर, रामेश्वर अशा भारतातील अनेक महत्त्वाच्या ठिकाणी विशाल यज्ञ व त्यांच्या आसपासच्या परिसरात घरोघरी गायत्री यज्ञ संपन्न झाले.

घराघरातून केले जाणारे हे यज्ञ करायला सोपे आणि प्रेरणाप्रद ठरले. गायत्री परिवाराच्या शाखा देश विदेशामध्ये सुरू झाल्या. नियमित यज्ञ व गायत्री जप करणारे साधक लाखोंच्या संख्येने निर्माण झाले. यावर्षी सोळा मे रोजी बुद्ध पौर्णिमेला अखिल विश्व गायत्री परिवाराच्या आवाहनानंतर २५ लक्ष घरांमध्ये व जगातील ९८ देशांमध्ये गायत्री यज्ञ घरोघरी करण्यात आले. गायत्री यज्ञाच्या माध्यमातून वैदिक संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाची लाट निर्माण होईल व गायत्री परिवाराला अभिप्रेत असलेले युग परिवर्तन साकार करील असा विश्वास गायत्री साधकांना वाटतो.

गायत्री परिवाराचे जनक पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांनी लिहून ठेवले आहे की सध्याची परिस्थिती मानवतेच्या दृष्टीने कितीही बिकट दिसत असली, **तरी एकविसावे शतक हे उज्वल भविष्य घेऊन येणार आहे.** त्यासाठी प्रत्येक माणसाला आपले विचार बदलावे लागतील, मन मोठे करावे लागेल, सद्गुणांचा विकास करावा लागेल. व्यक्ती व्यक्ती मध्ये घडवून आणण्याच्या या परिवर्तनासाठी **गायत्री मंत्राचा जप व गायत्रीयज्ञाचे नित्यकर्म** हे अत्यंत उपयोगी ठरणार आहे. हे विचार ज्यांना पटतील, त्या सर्वांनी एकत्र येऊन सामूहिक जप व सामूहिक यज्ञकार्य जागोजागी सुरू करावे असे गायत्री परिवाराचे आवाहन आहे. अधिक माहितीसाठी संपर्क - हेमंत जोगळेकर : ७५८८२८३४०२, गायत्री चेतना केंद्र वाघोली - ९५७९१९६१९०, अखिल विश्व गायत्री परिवार : www.awgp.org

**यज्ञ कसा करावा – काय आहे ही सुलभ गायत्री यज्ञाची प्रक्रिया?**

**१) पवित्रीकरण :** यज्ञ कार्य सुरू करण्याआधी स्वत:वर, तसेच यज्ञात वापरायच्या सर्व भांड्यांवर भावनापूर्वक तीर्थ शिंपडून, ती पवित्र केली जातात.

**२) चंदनधारणम्, शिखावंदनम्, प्राणायाम :** शिखास्थानाला स्पर्श करावा. कपाळावर गंध लावून घ्यावे. चित्त एकाग्र करण्यासाठी तीन वेळा प्राणायाम करावा.

**३) गुरुवंदना व देव आवाहन :** आपापल्या गुरूंचे स्मरण, वंदन करून आराध्य देवता किंवा सद्बुध्दीदात्री गायत्री माता यांना आवाहन व त्यांचे भावपूर्ण पंचोपचार पूजन करावे. (धूप, दीप, अक्षता, पुष्प व नैवेद्य)

**४) अग्निस्थापना :** आवाहित दैवी शक्तींच्या समोर यज्ञ कार्याला सुरुवात करताना प्रथम अग्निस्थापना करावी. यज्ञकुंडात गोवऱ्या किंवा समिधा व्यवस्थित रचून ठेवाव्यात. गोवरीवर ठेवलेली तुपाची वात पेटवावी व अग्निप्रज्वलित होण्यासाठी कुंडात तूप किंवा कापूर शिंपडावा.

**५) समिधाधानम् :** आंब्याच्या किंवा उंबर, पिंपळ या वृक्षांच्या वाळक्या चार समिधा मंत्र म्हणून यज्ञाच्या अग्नीमध्ये अर्पण कराव्यात.

**६) जलप्रसेचनम् :** यज्ञकुंडाच्या चारी बाजुंना मंत्र म्हणून पाणी शिंपडावे.

**७) आज्याहुती :** तुपाच्या सात आहुती प्रजापती, इंद्र, अग्नी, सोम व भू:, भुव:, स्व: यांना द्याव्यात.

**८) गायत्री मंत्राहुती :** त्यानंतर गायत्री मंत्राच्या बारा, चोवीस किंवा जास्त आहुती मंत्राचा मोठ्याने उच्चार करून व शरीरामध्ये तेज व सद्बुध्दीचा लाभ यज्ञाद्वारे होत आहे अशी भावना ठेवून कराव्यात. मुख्य व्यक्तीने तुपाच्या व यज्ञकुंडा भोवती बसलेल्या सर्वांनी औषधी सुगंधी हवन सामग्रीच्या आहुती अग्नीमध्ये स्वाहा म्हणत अर्पण कराव्यात.

**९) अन्य मंत्राहुती :** आरोग्याच्या प्राप्तीसाठी महामृत्युंजय मंत्र व आवडीप्रमाणे अन्य देवतांचे गायत्री मंत्र म्हणून त्यांच्याही आहुती अशा यज्ञात देऊ शकतो. आहुती अर्पण करताना मंत्राला भावनांची जोड द्यायला हवी हे महत्त्वाचे!

**१०) स्विष्टकृत होम :** मधुर पदार्थाची (साखर, गूळ किंवा नैवेद्य) आहुती प्रायश्चित्त रूपाने द्यावी.

**११) पूर्णाहुती व देवदक्षिणा :** देव शक्तींच्या उपस्थितीत एक सद्गुण आत्मसात करण्याची व एक दुर्गुण सोडून देण्याची देवदक्षिणा मनोमन अर्पण करून, पूर्णमद:... मंत्र म्हणत, अग्नीमध्ये सुपारीची आहुती द्यावी.

**१२) वसोर्धारा :** उरलेल्या तुपाची धार अग्नीमध्ये अर्पण करावी.

**१३) आरती :** आवाहन केलेल्या दैवी शक्तींची निरांजन ओवाळून आरती करावी.

**१४) यज्ञाचे दोन प्रसाद : एक – घृत अवघ्राण :** यज्ञात आहुती देताना तुपाचा एक थेंब शेजारच्या भांड्यात पाडायचा असतो. ते तूप तळहातावर चोळून तळहात यज्ञकुंडाकडे करून नंतर हाताच्या ओंजळीचा दीर्घ वास घ्यावा व नंतर हाताद्वारे सर्व शरीराला स्पर्श करून यज्ञाची ऊर्जा शरीरामध्ये स्थापित करावी. **दोन – भस्म धारण :** ऋषींचे स्मरण करीत यज्ञ भस्म कपाळाला, गळ्याला, उजव्या खांद्याला, हृदयाला लावावे.

यानंतर सूर्याला अर्घ्य द्यावे. शुभकामना मंत्र म्हणावा व शेवटी सर्व देवशक्तींना साष्टांग नमस्कार घालावा.

अशाप्रकारे यज्ञ पूर्ण झाल्यानंतर **कमीत कमी पाच मिनिटे यज्ञ स्थळी शांत बसून प्राणायाम करावा किंवा प्रार्थना, ध्यान करावे.** शेवटी यज्ञ स्तुतीची प्रार्थना करावी व स्विष्टकृत होम करताना वापरलेला मधुर पदार्थ, प्रसाद म्हणून सर्वांना वाटावा. यज्ञाचे भस्म देखील डबीत भरून रोज भस्मधारण केल्याने पवित्रता व उत्साह अनुभवास येतो.

असा यज्ञ घरोघरी पौर्णिमा अमावस्येला किंवा दर रविवारी किंवा शक्य झाल्यास दररोज देखील करावा. सुगंधी औषधींच्या हवनामुळे व मंत्रध्वनीच्या कंपनांमुळे घरातील वातावरण प्रसन्न होते. मानसिक स्तरावर प्रेरणा व सद्बुध्दी प्राप्त होते व सूक्ष्म वातावरणात देखील सात्विकता व सकारात्मकता भरून राहते, असा साधकांचा अनुभव आहे.

गायत्री मंत्र व गायत्री यज्ञ याविषयी अधिक माहितीसाठी पुण्यातील **गायत्री चेतना केंद्र, वाघोली,** येथे येण्याचे सर्वांना आमंत्रण आहे. येथे मार्गदर्शनासाठी किंवा घरोघरी जाऊन यज्ञ करण्यासाठी देखील गुरुजन सदैव उपस्थित असतात. गायत्री चेतना केंद्र, वाघोली, फोन नं ९५७९१९६१९०, हेमंत जोगळेकर, फोन नं ७५८८२८३४०२ अखिल विश्व गायत्री परिवार : www.awgp.org

वर वर्णन केलेले यज्ञाचे सर्व मंत्र पुस्तक रूपाने उपलब्ध आहेत किंवा पीडीएफ फाईल सुद्धा पाठवता येईल.


**ज्येष्ठ पत्रकार मधुकर गोपीनाथ भावे यांना आबासाहेब वीर पुरस्कार**



महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार, गांधीवादी विचारांचे पुरस्कर्ते, महाराष्ट्रातील परंपरेला आपल्या लेखणीद्वारे पाठबळ देणारे, महाराष्ट्राच्या राजकीय पटाचा गाढा अभ्यास असणारे लेखक मधुकर गोपीनाथ भावे यांना यंदाचा आबासाहेब वीर सामाजिक पुरस्कार गुरुवार, दि. १८ ऑगस्ट २०२२ ला भुईंज, ता. वाई येथे झालेल्या कार्यक्रमात प्रदान केला गेला. आबासाहेब वीर यांच्या ११७ व्या जयंती निमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

**भावे मित्र मंडळातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!!!**

## सहवेदना




**सुशीला नारायण भावे** यांचे शनिवार, दि. १६ जुलै २०२२ या दिवशी अल्पशा आजाराने वयाच्या ९० व्या वर्षी पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा अजय, सून अंजली, कन्या रेखा, जावई, नातू अनमोल व नातसून असा परिवार आहे.

त्यांचा जन्म मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यातील देवरी या गावातील जोशी कुटुंबात झाला होता. लग्नानंतर पतीच्या रेल्वेतील नोकरीमुळे त्यांना गांधीधाम येथे रहावे लागले. १९५५ मध्ये त्या मुंबईत आल्या. मुंबईतल्या बायका घराबाहेर पडून नोकरी करू लागल्या होत्या. त्यांच्या लक्षात आले आता गरज अशी निर्माण झाली आहे की अशा मुलींच्या छकुल्यांना विश्वासानं दिवसभर सांभाळणारं कोणीतरी हवयं. त्यांच्या पतींनी नुकतंच दोन खणांचं घर अंधेरीला घेतलं होतं. त्यासाठीच्या कर्जाची फेड करणं, मुलांची शिक्षणं, सततचा पै पाहुणा या सगळ्यांचा विचार करून त्यांनी लहान मुलांचं पाळणाघर सुरू करायचा निर्णय घेतला. सुरुवातीला काही मुलं फक्त सहा ते नऊ महिने वयाची होती. हळूहळू दोनची सहा-सात मुलं झाली. यामुळे आर्थिक पाठबळ मिळू लागलं. माणसं जोडण्याचा, मदत करण्याचा स्वभाव असल्याने शेजार-पाजाऱ्यांशी संबंध वाढू लागले. त्यांच्या आग्रहावरून पुरणपोळ्यांच्या स्पर्धेत भाग घेतला. बक्षीसही मिळालं. झालं! मुलं सांभाळण्याबरोबरच 'पुरणपोळी करून द्याच बरं का काकू.' अशी लाघवी ऑर्डर मिळू लागली. चातुर्मासाच्या पदार्थांची, वाढदिवसासाठीच्या पदार्थांची आणि मग बाराही महिने साटोऱ्या, उकडीचे मोदक, चकल्या, चिवडा इ. पदार्थ सुशीलाकाकूंचेच हवेत अशा मागण्या येऊ लागल्या. परदेशातही हे पदार्थ मंडळी घेऊन जाऊ लागली. वेळापत्रकाचे तीन-तेरा वाजू नयेत म्हणून मग पहाटे तीन-चारलाच उठून उजाडायच्या आत कामे सुरू, कारण दिवस उजाडताच इतर कामे 'आ' वासून रांगेत उभी असतच. त्यांचे मन अगदी आनंदी असे. नाटकात काम करण्याची हौस, मंगळागौर खेळणं, मुलांबरोबर पत्ते, कॅरम खेळणं, सोसायटीच्या गणेशोत्सवात भाग घेणं, हलव्याचे दागिने करणं या सर्व गोष्टी त्या हौसेनं जमवत असत. चाळीतील दोन खोल्यांच्या घरात आपल्या कुटुंबाव्यतिरिक्त अगदी सांगोपांग लग्नं, मुंजी, अनेक मंगळागौरी वगैरे चुलत-मावस सासरच्यांची कार्यही यथासांग पार पडली. कारण मुंबईतलं हे एकच घर मुंबईबाहेरच्या सर्व नातेवाईकांना हक्काचं होतं.

कुटुंब चालवण्यासाठी नव्हे तर अंगवळणी पडले म्हणून कुणाला लोणचं घालून दे, कुणा ज्येष्ठ वृध्दांना पोळी-भाजीचा डबा दे असे चालू होतेच. पती रेल्वेत असल्याने फिरण्याचा आनंदही त्यांनी आवर्जून घेतला. अनमोलला (नातू) राष्ट्रपती पदक मिळाले तेव्हाही त्या कौतुकाने दिल्लीला गेल्या होत्या. त्यांचा पंच्याऐंशीवा वाढदिवस २०१७ साली पुण्यात थाटामाटानं साजरा केला होता.

**त्यांच्या आत्म्याला सद्गती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.**

# सहवेदना



**माधव दत्तात्रय भावे, रोहा** यांचे रविवार, दि. ३१ जुलै २०२२ या दिवशी अल्पशा आजाराने वयाच्या ७७ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी सुषमा, मुलगा मंदार, सून, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

त्यांचा जन्म रोहा येथे दि. १५ मे १९४६ या दिवशी झाला. त्यांचे इंटरपर्यंत शिक्षण कोल्हापूर येथे झाले होते. रोहा येथे ते प्रभाकर विविध वस्तू भांडार या नावाने स्टेशनरी व विविध वस्तूंच्या विक्रीचा व्यवसाय करीत असत.

सामाजिक जाणीवा जागृत असल्याने तसेच शिक्षण क्षेत्रातील गरजा लक्षात घेत रोह्यात कार्यरत असलेल्या विविध संस्थांमध्ये ते सहभागी झाले. अनेक महत्त्वाच्या पदांवर माधवरावांनी अतिशय उल्लेखनीय काम केले. यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो भाटे सार्वजनिक वाचनालय रोहा, जे. एस. एम. महाविद्यालय, अलिबाग, छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण, राष्ट्रीय शिक्षण संस्था, परळ अशा विविध संस्थांचा. सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या रोहा अष्टमी सहकारी अर्बन बँकेवर ९ वर्षे संचालक व मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून त्यांनी काम पाहिले. रोह्याच्या कुंडलिका नागरी सहकारी पतसंस्थेवर या पतसंस्थेच्या स्थापनेपासून २५ वर्षे ज्येष्ठ सल्लागार म्हणून त्यांनी काम केले.

दैनिक तरूण भारत, साप्ताहिक विवेक या नियतकालिकांतून वैविध्यपूर्ण विषयांवर माधवरावांनी लेखन केले आहे. पत्रकारितेतील दीर्घकालीन कामाबद्दल व विधायक पत्रकारितेबद्दल रायगड जिल्हा पत्रकार संघाने रायगड भूषण पुरस्कार देऊन त्यांना गौरविले होते, तर रोहा प्रेस क्लबने त्यांना पत्रकारितेबद्दलचा जीवन गौरव पुरस्कार दिला होता. हिंदुस्थान प्रकाशन संस्था (साप्ताहिक विवेक) या संस्थेचे कार्यवाह म्हणूनही त्यांनी काम केले. कोकणचे आघाडीचे वर्तमानपत्र दैनिक सागर हे रायगड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात सुरू करण्यासाठी खूप परिश्रम घेतले. माधवरावांचे निरनिराळ्या विषयांवरील लेख, स्तंभलेखन, राजकीय विश्लेषण व वार्तांकन दैनिक सागरमध्ये नेहमीच प्रसिध्द होत असे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत घडलेल्या माधवरावांनी संघाच्या विविध पदांवर काम केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रायगड जिल्ह्याचे ते संघचालक होते. संघाच्या प्रचार व प्रसारासाठी नेहमीच ते कार्यरत राहिले. संघाच्या विचारसरणीचा पगडा असल्याने प्रखर राष्ट्राभिमान त्यांनी जपला. त्यांना आणिबाणीच्या काळात मिसा खाली १४ महिने नाशिक व ठाणे येथे स्थानबद्धतेत ठेवण्यात आले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समितीचे कोकण प्रांत उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय काम केले. त्यांनी महाड येथील जनकल्याण रक्तपेढीला स्थापनेपासून प्रगतीच्या वाटेवर स्थिरावेपर्यंत फार मोठे सहकार्य केले.

रायगड जिल्हा दूरसंचार विभाग समितीवर सदस्य म्हणून खासदारांच्या माध्यमातून नियुक्ती झाल्यानंतर संपूर्ण रायगड जिल्हा फिरून दूरसंचार विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन सभा घेतल्या व सर्वसामान्यांसह, व्यापारी वर्ग व उद्योजकांची दूरध्वनीविषयक कामे मार्गी लावली.

रोह्याच्या धार्मिक क्षेत्रातही तितकेच आवडीने रममाण होणारे माधवराव कीर्तनकार व प्रवचनकार म्हणून केवळ रोह्यातच नव्हे तर रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध होते. भजन व कीर्तनाची आवड असल्याने आणि विविध विषयांचा व धार्मिक ग्रंथांचा उत्कृष्ट अभ्यास असल्याने कोणत्याही विषयावरील त्यांचे भजन वा कीर्तन आपसूक रंगत असे. विषयाच्या सुंदर मांडणीमुळे आणि संवाद साधण्याच्या शैलीमुळे त्यांच्या कीर्तनात व भजनात श्रोते मंत्रमुग्ध होत असत. धार्मिक संस्थांच्या जडणघडणीत त्यांचा महत्वाचा वाटा होता. ग्रामदैवत श्री धावीर महाराज देवस्थान ट्रस्टमध्ये ज्येष्ठ सल्लागार म्हणून ते कार्यरत होते, तर श्री मारूती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष आणि श्री रामचंद्र देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष म्हणून काम करताना या देवस्थानांच्या उपक्रमात त्यांनी सातत्य ठेवले होते. अतिशय पराकाष्ठेने श्रीराम नवमी, श्रीगोंदवलेकर महाराज उत्सव आणि श्रीहनुमान जयंती सारखे कार्यक्रम त्यांनी राबविले व भक्तांच्या सहकार्यातून यशस्वी केले. १०० वर्षांची परंपरा असलेल्या गुरूवार भजनी मंडळाच्या माध्यमातून उत्कृष्ट काम केले आहे व रोह्यातील भजनी मंडळाची अखंडता जपली आहे. त्यात माधवराव भावे यांचा मोठा वाटा आहे.

२०१२ साली अलिबाग येथे झालेल्या भावे मित्र मंडळाच्या कुलसंमेलनाचे संपूर्ण संयोजन त्यांनी यशस्वीपणे केले होते. संमेलन उत्तम होईल याची सर्वतोपरी काळजी त्यांनी घेतली होती. एवढ्यावरच न थांबता भावे मित्र मंडळाच्या वाढीसाठी त्यांनी रायगड जिल्ह्यातील सदस्य नोंदणीचेही कामही आत्मियतेने केले. **या कार्याची नोंद घेऊन २०१७ साली चिपळूणला झालेल्या भावे मित्र मंडळाच्या संमेलनात त्यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते.** **भावे मित्र मंडळातर्फे त्यांना श्रद्धांजली!!!**

## आवाहन

सर्व भावे कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना विनंती की, त्यांनी आपल्या कुटुंबियांपैकी कोणाचेही विशेष प्राविण्य, सत्कार, गौरव, वाढदिवस अथवा महत्त्वाच्या पदावर नियुक्ती इत्यादी प्रकारची कोणतीही महत्त्वाची घटना त्या प्रसंगाच्या फोटोसह bhave1956@gmail.com या मेलवर पाठवावी, किंवा अभय शंकर भावे यांना ९४२२३०६०३३ या भ्रमणध्वनीवर Whats App वर पाठवावी म्हणजे त्याचे वृत्त पुढील अंकात समाविष्ट करता येईल. अशा वृत्तांमुळे आपल्या आनंदात सर्वच भावे कुलबंधू, भगिनी व माहेरवाशिणींना सहभागी होता येईल.

'भावे-प्रयोग' हा प्राजक्तचा अंक सर्व भाव्यांना व माहेरवाशिणींना कोणतीही वर्गणी न घेता पाठवला जातो. अंक पाठविण्याचा संमेलनाची वर्गणी, आजीव सदस्यत्त्व किंवा स्वनिधीला दिलेली रक्कम याचेशी कोणताही संबंध नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. म्हणजेच आपण सदस्यत्त्व, स्वनिधीची रक्कम द्यावीच, पण 'भावे-प्रयोग' हा प्राजक्तचा अंक आला नाही तरी जरूर कळवावे. अंक शिल्लक असल्यास नक्की पाठविला जाईल. आपला बदललेला पत्ता, फोन नंबर व मेल ॲड्रेस खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवावा किंवा फोनवर कळवावा, म्हणजे सर्व मेलिंग लिस्टमधे तो अद्ययावत होईल. 'भावे-प्रयोग'या भावे मित्र मंडळाच्या प्राजक्तच्या अंकासाठी साहित्यही या पत्त्यावर पाठवावे. **भावे मित्र मंडळ, १२४४, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.**

# सहकार क्षेत्रातील आणि समाजकारणातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व माधवराव भावे

© सुवर्णा भावे, जोशी.

३१ जुलैला माधवराव भावे म्हणजेच माझा माधवकाका याला देवाज्ञा झाली. सकाळीच ही वाईट बातमी ऐकल्यावर आम्ही उभयता रोह्यात जाऊन माधवकाकाचं अंत्यदर्शन घेतलं. त्याच्याबद्दल लोकं अनंत आठवणी काढत होती, त्यावेळेस एक सार्वजनिक जीवनात वावरणारा, अफाट लोकसंग्रह असलेला माणूस माधवराव असं वेगळं रूप मी स्तब्ध राहून अनुभवलं. माधवराव भावे या सहकार क्षेत्रातील, संघकार्यकर्ता म्हणून, एक समाजकारणी म्हणून असलेलं अलौकिक व्यक्तीमत्त्व मला जे दिसलं, समजलं आणि भावलं त्याला शब्दरूप देऊन, शब्दांजली वाहण्याचा हा एक प्रयत्न करते.

मी रोहा अर्बन बँकेत नोकरीत असताना पंधरा वर्ष माधवराव सुद्धा संचालक किंवा मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून कार्यरत होते. त्यावेळेस त्यांची अनेक वैशिष्ट्ये जाणवली. शक्यतो, होता होईतो नियम, कायदा धाब्यावर बसवू नये, जसा सहकारी संस्थेच्या सभासदांचा विचार करणं आवश्यक आहे, तसाच संस्थेचाही विचार करूनच धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. आम्ही बँकेत काऊंटरवर बसायचो तेव्हा लोकांशी संपर्क यायचा, तेव्हा आम्हाला ते नेहमीच सांगत की, 'लोकांशी बोलताना जिभेवर खडीसाखर आणि डोक्यावर बर्फाची पिशवी असेल, असं वागायला हवं, तरच आपली कर्तव्यं व्यवस्थित पार पाडली जातात. समोरचा सभासद चिडला असेल, आपली बाजू बरोबर असली तरीही आपण संयमानेच वागून त्या व्यक्तीची समजूत काढायलाच हवी. सभासद हा संस्थेचा पाया आहे, त्यांच्याशी संवाद साधत व्यवहार केले पाहिजेत. पदाधिकारी आणि संचालक हे संस्थेचे विश्वस्त असतात, मग ती संस्था बँक असो, पतसंस्था असो की गृहनिर्माण संस्था असो, ही मूळ गोष्ट सर्वांनी सदैव लक्षात ठेवली पाहिजे. जसं सभासदांची कामं करणं ही आपली जबाबदारी आहे, तसंच ही कामं करताना कायदेकानून आणि संस्थेचे पोटनियम यांचे उल्लंघन होणार नाही, हे पहाणं ही सुद्धा आपलीच जबाबदारी आहे.' बँकेतील नोकरीनंतर मी पतसंस्थेत केलेल्या नोकरीत या सर्व शिकवणीचा मला व्यक्तीशः खूप फायदा झालेला आहे.

माधवराव माझे काका आहेत आणि मी त्यांची पुतणी हे बँकेत असताना आम्ही कधीच लक्षात घेत नव्हतो, इतर जणं जसे तशीच मी. मी सुद्धा त्यांना इतरांप्रमाणेच माधवराव म्हणायचे. आपली पुतणी म्हणून पार्शलिटी तर दूरच पण शक्यतो संभाषणही नसे, कारण कोणीही त्यावरून बोलता कामा नये, अर्थात आमचे नाना (माझे वडील) सुद्धा शाळेत शिक्षक असूनही इतर मुलांप्रमाणेच वागवत याची सवय होतीच. तत्त्वनिष्ठ माणसं जवळून पाहण्याचं भाग्य मला मिळालं म्हणून खूप काही शिकता आलं.

रोहा अर्बन बँक, कुंडलिका पतपेढी, कमळ नागरी पतसंस्था, महाडची ब्लड बँक अशा अनेक संस्थांशी माधवराव निगडित होते. बँक सोडून इतरत्र ते मार्गदर्शक म्हणून काम पहात होते. या सगळ्यातून आपला व्यवसाय म्हणजेच प्रभाकर वस्तू भांडार हे राम मारुती चौकातलं दुकान, ते ही काटेकोर व्यवहार करत चालविणे, घरातही व्यवहारात संपूर्ण लक्ष असणे, या बरोबरच अत्यंत महत्त्वाचं म्हणजेच संघाचं काम, फार मोठी जबाबदारी पार पाडत निभावणे, हे एकाच व्यक्तीने लीलया करणं हे अक्षरशः अद्भुत होतं. अनेकांना माधवराव आपल्या घरातलेच वाटत. त्यांच्याकडे सल्ला घेतला की आपली अडचण दूर होणारच याची खात्री असे.

रोह्यातील सर्व देवस्थानं, साजरे होणारे सार्वजनिक उत्सव या सगळ्याशीच त्यांचा निकटचा संबंध असे. ज्या आत्मीयतेने एखाद्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते हिरीरीने आपली मतं मांडत, त्याच आत्मीयतेने आमच्या धनगर आळीतल्या गोविंदाबरोबर ते घरापासून रामचौकापर्यंत गोविंदा खेळत खेळत जात. ज्यावेळेस आणीबाणीनंतर माधवराव तुरुंगवास संपवून परत आल्यावर पहिला गोकुळाष्टमीचा उत्सव आला, त्यावेळेस लोकांनी माधवरावांना अक्षरशः नाचवत गोविंदापर्यंत आणलं. ते तुरुंगवास भोगत असताना गोविंदातली त्यांची रिकामी जागा लोकांना दुःख देई, आमचे माधवराव कधी सुटून येणार याची ते वाट बघत होते, लोकांचं इतकं प्रेम लाभण्यासाठी तितकं एकरूप होऊन सार्वजनिक आयुष्य जगावं लागतं, तेव्हाच हे भाग्य लाभतं.

समाजकारणात असतानाच वर्तमानपत्राशी सुद्धा माधवराव संबंधित होतेच. चिपळूणातून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक सागरचं रोह्यातलं पहिलं ऑफिस माधवरावांच्या घरातच होतं. त्याची घडी नीट बसवून देऊन मग ते नवीन जागेत गेलं. प्रसंगी त्याच वर्तमानपत्रात उत्तम लिखाणही माधवरावांनी केलं. या दैनिक सागरमुळेच माझे अहो आणि माधवराव यांचा उत्तम घरोबा होता, आमच्या लग्नाआधीच. 'त्यावेळेस आम्ही कितीतरी वेळेस माधवरावांकडेच रहायचो, हॉटेलात रहायला जायचं नाही असं ते बजावत.' अशी आठवण अहो सांगतात.

बाहेर इतका मोठा माणूस असलेला आमचा माधवकाका घरी मात्र आमचा ए माधवकाका असे. गणपतीत त्यांच्या घरची आरती झाली की पेटी तबल्यासह सगळेच आमच्या घरच्या आरतीला हजर. माधवकाकाही सर्वांबरोबर खूप वरच्या स्वरात देवे म्हणणार!! काकू आणि तो वेगवेगळ्या आरत्या व्हाव्यात दोन्ही घरात हे पहाणार!! आमच्या आईला, 'लीलावहिनी येतो हां.' असं सांगून घरी जाणार! आता काही दिवसावर गणपती आलेत, आत्तापासूनच पोटात कालवाकालव होतेय, की त्याच्याशिवाय यापुढचे सगळे गणपती उत्सव आम्ही कसे साजरे करणार? आमचा दीड दिवसांचा गणपती विसर्जन झाल्यावर मग त्यांच्याकडे आवर्तनं, ब्राह्मण भोजनाला आम्ही यायचंय, घरातली चूल बंद ठेवायची आहे असं साग्रसंगीत बोलावणं तो आणि काकू आवर्जून करायचे. मी आणि अहो दीड दिवसाचा गणपती विसर्जन झाल्यावर लगेच चिपळूणात जायचं नाही, आमच्याकडची आवर्तनं आणि भोजन झाल्यानंतर जायचं ऐकलं का प्रल्हाद, असं म्हणून तो मनापासून हसायचा, त्याचीच आठवण आम्ही दोघे रोह्यातून परत येताना ट्रेन मध्ये काढत होतो.

एक सार्वजनिक जीवनात लीलया संचार करणारा लोकाभिमुख नेता, अफाट लोकसंग्रह असलेला संघाचा पदाधिकारी, कुटुंबवत्सल काका आणि नातवंडांच्यात रमणारे आजोबा, असे माधवराव आता आपल्यात नाहीत, हे खरंच वाटत नाहीये. कै.माधवराव भावे यांना विनम्र अभिवादन!!

⌘⌘⌘

**संपर्क :** फ्लॅट नं. बी २१, अश्विनी अपार्टमेंट, बेंदकर आळी, मु. पो. चिपळूण, जि रत्नागिरी ४१५६०५ **भ्रमणध्वनी :** ९४२१८९५८५४

## गोष्ट कोहिनूर हिऱ्याची

**वृत्तसेवा, पुणे –** ३ जुलै १८५० रोजी 'कोहिनूर' हिरा इस्ट इंडिया कंपनीच्या अध्यक्षांनी भारतातून नेऊन इंग्लंडच्या राणीच्या स्वाधीन केला.

कोहिनूर (अर्थ - प्रकाशाचा पर्वत) हा जगातल्या सर्वात प्रसिद्ध हिऱ्यांपैकी एक आणि एकेकाळी जगातला सर्वांत मोठा असलेला मूळचा भारतीय हिरा आहे.

कोहिनूरचा इतिहास रंजक कथांनी भरलेला आहे. हा हिरा कधीच कोणी विकला किंवा खरेदी केला नाही. मात्र त्याने कितीतरी मालक बदलले. कोहिनूरचा इतिहास हा खून, लढाया, सत्ता व शोकांतिकांचा इतिहास आहे. काही सूत्रांनुसार कोहिनूर सुरुवातीस फारसा चमकदार नसून, थोडा मळकट व पिवळसर रंगाचा होता. सुमारे चार हजार वर्षांपूर्वी तो भारतातील गोवळकोंडा येथील खाणीत सापडला असावा.

पौराणिक कथेप्रमाणे, सूर्याने सत्राजित राजाला दिलेला हाच तो स्यमंतक मणी. सत्राजिताचा भाऊ प्रसेन हा हिरा बरोबर घेऊन शिकारीला गेला होता. तिथे एका सिंहाने त्याला मारून तो मणी नेला. पुढे जाम्बुवंताने सिंहाला मारून मणी हस्तगत केला. मात्र मणी चोरल्याचा आळ आला श्रीकृष्णावर. श्रीकृष्णाने मण्याचा शोध घेऊन पुढे जाम्बुवंताशी युद्ध केले. अखेरीस जाम्बुवंताने श्रीकृष्णाला शरण जाऊन त्याला मणी व आपली कन्या जाम्बुवंती अर्पण केली. श्रीकृष्णाने स्यमंतक मणी सत्राजितास परत केला. पुढे सत्राजिताची मुलगी सत्यभामा हिच्याशी श्रीकृष्णाचा विवाह होऊन श्रीकृष्णाला स्यमंतक मणी वरदक्षिणेत मिळाला. त्यानंतर श्रीकृष्णाने तो सूर्याला परत केला असे म्हणतात.

१६ व्या शतकामध्ये आलेल्या 'बाबर बादशहाचा इतिहास, बाबरनामा' (इ. सन १५२६ ते १५३०), यात या हिऱ्याचा उल्लेख येतो. मे १५२६ मध्ये बाबर जेव्हा आग्रा येथे आला, तेव्हा तेथील राजा विक्रमादित्य याने तो दिला असावा. पुढे हा हिरा बाबराचा मुलगा हुमायून याच्याकडे गेला. पुढील २०० वर्षे तो बाबराचा हिरा म्हणून ओळखला जात असे. काही सूत्रांनुसार 'द ग्रेट मुगल' आणि कोहिनूर हे हिरे एकच होत. पुढे हा हिरा मुगलांचे वारसदार शहाजहान व औरंगजेबाकडे आला.

पर्शियाचा (सध्याचा इराण) नादिर शहा याने मुगलांची दिल्ली व आग्रा ही शहरे लुटली, तेव्हा तो त्यांचे मयूर सिंहासन व कोहिनूर हिरा घेऊन मायदेशी परत गेला. पहिल्यांदा हा हिरा पाहिल्यावर नादिर शहा आश्चर्याने उद्गारला कोह-इनूर म्हणजे प्रकाशाचा पर्वत. तेव्हापासूनच कोहिनूर हे नाव प्रचलित आहे. इ.सन १७४७ मध्ये नादिर शहाचा खून झाला व कोहिनूर आला अफगाणिस्तानच्या अहमद-शहा-अब्दालीकडे. इ.सन १८०९ मध्ये अफगाणिस्तानच्या शाह शुजाला पदच्युत करण्यात आले, तेव्हा शुजा कोहिनूर घेऊन पळाला. शुजाने पंजाबचा महाराजा रणजितसिंग याची मदत घेऊन इ.सन १८३९ मध्ये अफगाणिस्तानची गादी परत मिळवली आणि कोहिनूर रणजितसिंगला कृतज्ञतापूर्वक भेट दिला.

कोहिनूरचा पुढील इतिहास रक्तलांछितच आहे. पुढे कोहिनूर पंजाबच्या महाराजा रणजितसिंगचा अल्पवयीन मुलगा दलिपसिंग याच्याकडे गेला. इंग्रजांनी रणजितसिंगाचा लाहोर येथे पराभव करून कोहिनूर जिंकला व तो इतर रत्नांबरोबर लंडन येथे बळजबरीने नेऊन राणी व्हिक्टोरिया हिला नजर केला (इ.सन १८५०). हिऱ्याबरोबर इंग्रजांनी दलिपसिंगलाही इंग्लंडला नेले.

इ.सन १८५३ मध्ये व्हिक्टोरियाचा पती, अल्बर्ट याने त्याला पुन्हा पैलू पाडायची टूम काढली. अल्बर्टच्या मूर्खपणामुळे त्याचे काही तुकडे वेगळे होऊन मूळ हिऱ्याचे वजनमात्र १८० कॅरेट वरून १०५ कॅरेट एवढे कमी झाले. सध्या हा हिरा लंडन येथील राणीच्या खजिन्यात (लंडन टॉवर येथे) पहावयास मिळतो.

एकूणच असे म्हणतात की कोहिनूर पुरुषांना लाभत नाही. त्याच्या बहुतेक पुरुष मालकांचे दु:खद मृत्यू झाले आहेत. स्त्रियांना मात्र त्याचा फारसा त्रास झालेला नाही.

भारताने कोहिनूर परत मिळवण्यासाठी काही प्रयत्न केले होते. १९४७ साली स्वातंत्र्यानंतर भारताने केलेली कोहिनूरची मागणी ब्रिटिशांनी धुडकावून लावली होती.

**महत्त्वाची वैधानिक सूचना –** 'भावे–प्रयोग' या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्याचे सर्व लेखनाधिकार त्या त्या लेखकांकडे आहेत. या अंकातील साहित्य अन्यत्र प्रकाशित करण्यापूर्वी त्या त्या लेखकांकडून पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. – संपादक.

**संपादक मंडळ : अभय शंकर भावे, संपादक**
शशिकिशोर दत्तात्रेय भावे, पर्शराम गोविंद भावे,
उदय नारायण भावे, शिल्पा मंदार भावे. (सल्लागार)

**प्राजक्त**

'प्राजक्त' हे सायंदैनिक मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांनी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट–गंगावेश रोड कोल्हापूर–४१६००२ येथे छापून प्राजक्त कार्यालय, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट–गंगावेश रोड, कोल्हापूर–४१६००२ येथून प्रसिध्द केले.
**संपादक : प्रफुल्ल डबीर. फोन : 0231-2540427**
**email -** prajakaweekly@gmail.com
RNI NO. : **M-6 (1457) / 70-RNI**
**Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS**